CMYK

## पहिला वनडे सामना : भारताचा वेस्ट इंडिजवर विजय

**बार्बाडोस** : पहिल्या एकदिवसीय सामन्यात भारताने वेस्ट इंडिजचा पाच विकेटने पराभव केला. बारबाडोसच्या मैदानावर वेस्ट इंडिजने दिलेल्या अवघ्या ११५ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना टीम इंडियाची दमछाक उडाली होती. भारतीय संघाने २३ षटकात ५ विकेटच्या मोबदल्यात ११८ धावांपर्यंत मजल मारली. भारताकडून ईशान किशन याने अर्धशतकी खेळी केली. या विजयासह भारतीय संघाने तीन सामन्याच्या एकदिवसीय मालिकेत १-० च्या फरकाने विजय मिळवला. ११५ माफक आव्हानाचा पाठलाग करतानाही भारतीय संघाची दमछाक उडाली. ११५ धावांसाठी भारतीय संघाला २३ षटके आणि पाच विकेट गमवाल्या लागल्या. ईशानने ४६ चेंडूत ५२ धावांची खेळी केली.

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

Supreme
People who know plastics best
'सुप्रीम'
ansons anco
कॉमेट
Authorised Dealer
Rivulis Irrigation
रिवुलीस ठिबक सिंचन
मल्लिकार्जुन हुळ्ळे मोबा.9423590463
शाम जाधव मोबा.9423588463
गुरुगणेश एन्टरप्राईजेस
'सुप्रीम'
Lubi PUMPS-MOTORS
वैष्णवी कॉर्नर, गोल्डफिंच पेठ, युको बँक शेजारी, भागवत टॉकिज समोर, सोलापूर.दु.नं.(0217)2725363
Email:guruganeshenterprises123@rediffmail.com

www.surajyadigital.com | शुक्रवार, दि. २८ जुलै २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २९९ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

# वळसंगमध्ये चोरट्यांनी सराफ दुकान फोडले
# २६ किलो चांदीसह ६६ तोळे सोने लांबवले

## शटर तोडून साधला डाव, परिसरातील ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण

सुराज्य/अक्कलकोट

**सोलापूर रस्त्यावरील वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) एका सराफ व्यापाऱ्याचे दुकान फोडून चोरट्यांनी दुकानातील रोख रक्कम ६६ तोळे सोन्याचे आणि २६ किलो चांदीचे दागिने असा एकूण ३७ लाख ८९ हजारांचा ऐवज पळविला. ही धाडसी चोरी बुधवारी पहाटेच्या सुमारास उघडकीस आली. या प्रकारामुळे परिसरातील ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.भर बाजारपेठेत असलेल्या पांडुरंग ज्वेलर्स या दुकानाचे शटर तोडून चोरट्यांनी हा डाव साधला.**






वळसंग येथील डीसीसी बँकेजवळ पांडुरंग ज्वेलर्स नावाचे सराफी दुकान आहे. दुकानाच्या पाठीमागे दुकानाचे मालक यशवंत महारुद्र चाकुर यांचे घर आहे. नेहमी प्रमाणे मंगळवारी रात्री ९ वाजेच्या सुमारास यशवंत चाकूर यांनी दुकानाचे शटर आणि चॅनल गेटला कुलूप लावून घरी गेले होते. बुधवारी पहाटे पाच वाजेच्या सुमारास चाकूर हे जागे झाले. आणि दुकाना जवळ साफ सफाई करण्यासाठी आले होते. त्यावेळी त्यांना दुकानाचे चॅनेल गेट जवळ मोडलेले कुलूप आणि दुकानाच्या लोखंडी शटरचा कोयंडा तुटल्याचे दिसून आले. आत जाऊन पाहणी केली असता ड्रावरमधील १ लाख रुपये तसेच शोकेस मध्ये लावलेले ६६० ग्रॅम सोन्याचे दागिने तसेच २६ किलो चांदीचे दागिने गायब झाल्याचे दिसून आले. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर त्यांनी वळसंग पोलिसांना याची माहिती दिली.

चाकूर यांनी रात्री नऊ वाजता दुकान बंद केले होते. मध्यरात्रीनंतर चोरट्यांनी सर्वप्रथम दुकानासमोर असलेले स्ट्रीटलाईटचे बल्ब फोडले. त्यानंतर दुकानासमोरील सीसीटीव्हीची वायर तोडली. चॅनल गेटचे कुलूप त्यानंतर आतील लोखंडी शटरचा कोयंडा कटावणीने तोडून दुकानात प्रवेश केला. आणि रोख रक्कम, ट्रे सहीत सर्व दागिने, ड्रॉव्हर मधील चेकबुक आदी इतर कागदपत्रे आदी गोणीत भरून पसार झाले. जाताना चोरट्यांनी सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे डीव्हीआर देखील सोबत नेले. घटनेची माहिती मिळताच पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर अधीक्षक हिंमत जाधव,उपविभागीय पोलीस अधिकारी यामावर, स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक निंबाळकर, वळसंग पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक अनिल सनगल्ले आणि पोलिसांचे पथक घटनास्थळी येऊन पाहणी केली. श्वान पथकाद्वारे चोरट्यांचा मार्ग शोधण्याचा प्रयत्न पोलिसांनी केला. पथकातील श्वान दुकानाच्या पाठीमागील पाण्याच्या डबक्यापर्यंत जाऊन घुटमळत राहिला. पाण्याच्या डबक्यात रिकामे दागिन्याचे ट्रे, दुकानदाराचे आधार कार्ड आणि इतर कागदपत्रे आढळली. ठसे तज्ञाच्या तपासात दुकानातील काचेवर ठसे आढळून आले. तसेच समोरील एका दुकानाच्या सीसीटीव्हीत दोन चोरटे वावरत असल्याचे अस्पष्टपणे दिसून आले.

**चोरीस गेलेल्या ६६ तोळे सोन्याच्या दागिन्यांमध्ये मंगळसूत्र, अंगठ्या, लॉकेट, इयरिंग, मोरण्या, बोरमाळ, ठुशीहार, साखळी टॉप, बदाम मोरव्या, पदक आणि लहान मुलांच्या अंगठ्या आदी. तर तर २६ किलो चांदीच्या दागिन्यांमध्ये ब्रेसलेट, हार, जोडवे, पैंजण आदीचा समावेश आहे**

### पुन्हा वळसंगमध्ये चोरीचा प्रयत्न

सराफ दुकानाची चोरीची घटना ताजी असताना पुन्हा गुरुवारी मध्य रात्री वळसंग येथील कोरे इंटरप्राईजेस या दुकानाचे कुलूप तोडून शटर उघडण्याचा प्रयत्न करण्यात आला. तर मनियार पान दुकान उचकटून ७ हजार रुपयांचा ऐवज चोरीस गेल्याचे आढळले. सराफ दुकानातील चोरी ही वळसंग परिसरातील पहिलीच मोठी घटना आहे. हा धाडसी प्रकार पाहून चोरट्यांनी पोलिसांना चॅलेंज दिल्याचे चर्चा नागरिकात आहे.

### विजेचा लपंडाव चालूच

गेल्या ८ दिवसापासून पाऊस चालूच आहे. त्यातून विजेच्या लपंडाव सुरू आहे. रात्रीच्या वेळी नेहमी वीज जात असते. त्यातूनच हा चोरीचा प्रकार घडला. वळसंग येथील एमएसईबीचे अधिकारी बदलून गेले.त्यामुळे कर्मचाऱ्यांचे विद्युत पुरवठ्याकडे दुर्लक्ष होत आहे का ? अशी चर्चा आणि टोमणेबाजी ग्रामस्थांमधून होत आहे.गावातील विद्युत पुरवठा सुरळीत करावा. तसेच रात्रीच्या वेळी पोलिसांच्या गस्तीत वाढ करावी. अशी ग्रामस्थांची मागणी आहे. दरम्यान या चोरीची फिर्याद दुकानाचे मालक यशवंत महारुद्रप्पा चाकूर (वय ५३ रा.वळसंग) यांनी वळसंग पोलिसात दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी चोरीचा गुन्हा दाखल केला. पुढील तपास सहाय्यक निरीक्षक अनिल सनगल्ले करीत आहेत.




सोलापुरात गेल्या ४ दिवसांपासून पावसाची संततधार सुरु आहे. शहरात ठिकठिकाणी सखल भाग जलमय झाला असून शहरवासियांना पाण्यातून वाट काढावी लागत आहे

## घरातील पत्र्याच्या शेडमध्ये उतरलेला करंट लागल्याने चंद्रहाळच्या महिलेचा मृत्यू

सुराज्य/सोलापूर

घरातील फरशी पुसताना पत्र्याच्या शेडमध्ये उतरलेला करंट लागल्याने महिलेचा मृत्यू झाला. शमशाद शेतसंदी (वय ३८, रा. चंद्रहाळ, ता.दक्षिण सोलापूर) असे त्या महिलेचे नाव आहे.

ही घटना गुरुवारी दुपारी घडली. मृत शमसाद या गुरुवारी दुपारी घरात एकट्या होत्या. त्यांचे पती व दोन मुले शेजारी असणाऱ्या धार्मिक स्थळात गेले होते. त्या दुपारी फरशी पुसताना त्यांचा हात पत्र्याला लागला. त्यांना शेडमधील करंट लागल्याने त्या जोरात किंचाळल्या. या आवाजाने पती धावत घराकडे आले. त्यावेळी शमसाद या बेशुध्द झालेल्या त्यांना दिसल्या. यामुळे त्यांनी लगेच त्यांना उपचारासाठी छत्रपती शिवाजी महाराज शासकिय रुग्णालयात दाखल केले.

दरम्यान, डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, मुलगी असा परिवार आहे. त्यांचे कुटुंब शेतीवरील उत्पन्नावर उदरनिर्वाह करत असल्याची माहिती त्यांच्या नातेवाइकांनी दिली.

हद्दवाढच्या सेवकांना ३५ वर्षांनंतर मिळाला न्याय

## महापालिका सेवकांप्रमाणे नियम लागू; आयुक्तांचा निर्णय

सुराज्य/सोलापूर

हद्दवाढ भागातील सेवकांना आता महापालिका सेवकांप्रमाणे सर्व नियम लागू करण्यात आले असून याशिवाय त्यांना पदोन्नतीचा लाभही मिळणार आहे. यामुळे तब्बल ३५ वर्षा नंतर अखेर हद्दवाढच्या सेवकांना न्याय मिळाला आहे. महापालिका आयुक्त शीतल तेली उगले यांनी गुरुवारी सर्वात मोठा आणि महत्त्वपूर्ण निर्णय घेतला.



**आयुक्तांनी दिला न्याय**

महापालिका सेवकांप्रमाणे सर्व लाभ मिळण्यासाठी हद्दवाढच्या सेवकांना तब्बल ३५ वर्ष प्रतिक्षा करावी लागली. काही सेवकांनी तर प्रतीक्षाच सोडुन दिली होती मात्र अखेर महापालिका आयुक्त उगले यांनी निर्णय घेत हद्दवाढच्या सेवकांना न्याय दिला.

१९९२ साली सोलापूर शहराची हद्दवाढ झाली आणि हद्दवाढ झाल्यानंतर यात १६ गावांचा समावेश महापालिकेत करण्यात आला होता. या १६ गावातील ग्रामपंचायतींमध्ये काम करणारे सुमारे ३०० कर्मचारी महापालिकेकडे वर्ग करण्यात आले होते. यावेळी हद्दवाढच्या ३०० सेवकांपैकी १७ कर्मचाऱ्यांनी न्यायालयात धाव घेऊन १९९२ पासून हद्दवाढच्या कर्मचाऱ्यांना फरक द्यावा अशी मागणी केली होती. तेव्हापासून आजपर्यंत म्हणजे तब्बल ३५ वर्ष झाली हद्दवाढच्या सेवकांना महापालिका सेवकांप्रमाणे कोणताही लाभ मिळत नव्हता. पदोन्नती नाही, वेतनवाढ नाही याशिवाय पेन्शन देखील मिळत नव्हती. यामुळे हद्दवाढ सेवकांवर एक प्रकारे अन्यायच झाला होता. कित्येक कर्मचारी सेवानिवृत्त झाले त्यांना अजून पेन्शन मिळाली नाही. ३०० पैकी केवळ ५० ते ५५ कर्मचारी सध्या महापालिका सेवेत कार्यरत आहेत. मात्र आता आयुक्तांनी घेतलेल्या निर्णयामुळे सध्या या सेवकांना महापालिका सेवकांना प्रमाणे सर्व लाभ मिळणार आहेत. सर्व नियमही लागू करण्यात आले आहेत.



## क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी घेऊन जाणाऱ्या रिक्षाचालकांवर कारवाई : पोलीस आयुक्त

**सोलापूर** : जिल्ह्यातील सर्व संबंधित शाळेच्या मुख्याध्यापक तसेच स्कूलबस चे मालक व चालक यांनी स्कूलबस नियमावली २०११ च्या तरतुदींचे पालन काटेकोरपणे पालन करावे, क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी घेऊन जाणाऱ्या रिक्षाचालकावर कारवाई करण्याचा इशारा पोलीस आयुक्त राजेंद्र माने यांनी दिला.

जिल्हा स्कूल बस सुरक्षितता समितीची बैठक पोलीस आयुक्तालयात पार पडली. यावेळी ते बोलत होते. या बैठकीस



पोलीस उपायुक्त अजित बोराडे, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड, वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त अजय परमार, जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक सायकर तसेच जिल्ह्यातील १८७ शाळाचे मुख्याध्यापक व शाळा प्रतिनिधी उपस्थित होते.

शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबत सर्व शाळांनी योग्य ती काळजी घ्यावी. तसेच सर्व शाळेच्या प्रमुखांना शाळेच्या आवारात हेल्मेट सक्ती करावे अशा सूचना पोलीस आयुक्तांनी दिल्या. शहरातील ऑटो रिक्षामधून क्षमतेपेक्षा जास्त संख्येने होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या वाहतुकींवर शहर वाहतूक शाखेतर्फे आता कारवाई करण्यात येणार आहे. प्रत्येक शाळेने स्कूल बसची पार्किंग व्यवस्था सुनियोजित करावी. तसेच स्कूलबस पार्किंगमुळे रस्त्यावरील वाहतुकीस अडथळा होणार नाही याबाबत काळजी घेण्याचे निर्देश पोलीस उपायुक्त बोराडे यांनी दिले.

## इसिसशी संबंध : गोंदियातून एक ताब्यात; एटीएसची कारवाई

सुराज्य/गोंदीया

दहशतवाद्यांशी संबंध असल्याच्या प्रकरणावरून गोंदियातून एकाला ताब्यात घेण्यात आले आहे. रत्नागिरीतूनही एकाला आधीच ताब्यात घेण्यात आले आहे.

महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकाने आज मोठी कारवाई केली आहे. पुण्यात आयसिसशी संबंधित असलेल्या दोघांना अटक केल्यानंतर राज्यभरात एटीएसने कारवाई सुरू केली आहे. पुण्यातील दहशतवाद्यांचे धागेदोरे गोंदियापर्यंत पोहचले आहेत. रत्नागिरीतून एकाला ताब्यात घेतल्यानंतर एटीएसने गोंदियातून एकाला ताब्यात घेतले आहे. अब्दुल कादिर पठाण (वय ३५) असे ताब्यात घेतलेल्या तरुणाचे नाव आहे. दरम्यान, आयसिसशी संबंध असल्याच्या प्रकरणी राष्ट्रीय तपास यंत्रणेने पाच जणांना अटक केली आहे.

गोंदियातील रामनगर येथील अब्दुलला पुणे पोलिसांनी गोंदिया पोलिसांच्या मदतीने ताब्यात घेतले. संशयिताला एटीएसने चौकशीसाठी पुण्यात नेले. पुण्यात या तरुणाची कसून चौकशी सुरू आहे. अटकेतील दोघांना ५ ऑगस्टपर्यंत एटीएस कोठडी सुनावण्यात आली आहे.


## सहाय्यक आयुक्त कोळी कार्यमुक्त

**सोलापूर** : सोलापूर महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त रुपाली कोळी यांच्याकडे सध्या महापालिकेचा मुख्य लेखापरीक्षण आणि अंतर्गत लेखा परीक्षण हे दोन महत्त्वाचे विभाग देण्यात आले होते.

यापूर्वी मुख्य लेखापाल विभाग ही त्यांच्याकडे देण्यात आला होता मात्र मुख्य लेखापाल विभागा मधून यापूर्वीच आयुक्तांनी त्यांना कार्यमुक्त केले होते दरम्यान गुरुवारी महापालिका आयुक्त शीतल तेली उगले यांनी दुसरा आदेश काढून अंतर्गत लेखापरीक्षण विभागातून ही सहाय्यक आयुक्त रूपाली कोळी यांना कार्यमुक्त केले.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



हा 'पक्षी' माझा आहे !

| कल्याण |
|---|
| 700-74-239 |

| मेन बाजार |
|---|
| 129-25-348 |


## विद्यापीठाचा जीवनगौरव पुरस्कार न्या.उदय लळीत यांना जाहीर

सुराज्य/सोलापूर

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा यंदाचा प्रतिष्ठेचा आणि मानाचा जीवनगौरव पुरस्कार सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त सरन्यायाधीश उदय उमेश लळीत यांना जाहीर झाल्याची घोषणा प्रभारी कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांनी गुरूवारी पत्रकार परिषदेत केली. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या वर्धापनदिनी दरवर्षी विविध पुरस्कार दिले जातात. या पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे.

सोलापूर विद्यापीठाच्या जीवनगौरव पुरस्काराची घोषणा करण्यात आली आहे. यात सोलापूर ही जन्मभूमी, कर्मभूमी आणि ऋणानुबंध असणाऱ्या महनीय व्यक्तीस जीवनगौरव हा प्रतिष्ठेचा पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला जातो. यंदाच्या या जीवनगौरव पुरस्काराचे मानकरी





उदय लळीत हे ठरले आहेत. विद्यापीठाच्या अधिकार मंडळाकडून जीवनगौरव पुरस्कार स्वीकारण्यासाठी लळीत यांना विनंती केली होती, त्यांनी सदरील विनंती स्वीकारली आहे. रोख ५१ हजार रुपये, स्मृतिचिन्ह, गौरवपत्र, शाल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. १ ऑगस्ट २०२३ रोजी विद्यापीठाचा १९ वा वर्धापन दिन समारंभ साजरा होणार आहे.

सकाळी आठ वाजता ध्वजारोहणाचा कार्यक्रम प्रभारी कुलगुरू डॉ. कामत यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर सकाळी नऊ वाजता सोलापूर शहरातील हुतात्मा स्मृती मंदिर सभागृहात पुरस्कार वितरण सोहळा पार पडणार आहे. या समारंभास मुंबई विद्यापीठ, मुंबईचे कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी हे मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. वर्धापन दिनाच्या या सोहळ्याला विद्यार्थी, शिक्षक, प्राचार्य, विविध अधिकार मंडळाचे सदस्य, शिक्षणप्रेमी नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाकडून करण्यात आले आहे.


### यांना जाहीर झाले पुरस्कार

- **उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार** : एन. बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, केगाव, सोलापूर
- **उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार** : प्राचार्य डॉ. शंकर नवले, एन. बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, केगाव, सोलापूर, प्राचार्य डॉ. राजशेखर हिरेमठ, श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सोलापूर
- **उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार (विद्यापीठ)**: डॉ. रवींद्र चिंचोलकर, सामाजिकशास्त्रे संकुल, डॉ. राजीवकुमार मेंते, संगणकशास्त्र संकुल
- **उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार (महाविद्यालय)**: प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा, डी. बी. एफ. दयानंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स, सोलापूर, प्रा. डॉ. चंद्रकांत चव्हाण, वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स सोलापूर
- **उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार**: डॉ.अभिजीत जगताप, वैद्यकीय अधिकारी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, डॉ. उमराव मेटकरी, उपकुलसचिव, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ.

CMYK

# विरोधकांची खुसपट...

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारला पुन्हा एकदा अविश्वास ठरावाला सामोरे जावे लागणार आहे. मणिपूरच्या प्रकरणावर लोकसभेत विरोधकांनी बराच हंगामा केला. अविश्वास ठराव आणण्याची धमकी दिली. सभापती ओम बिर्ला यांनी हा ठराव आणण्याला अनुमती देऊन पारदर्शकता दाखवून दिली. कारण सरकार काहींतरी लपवत आहे, असा संशय देशात निर्माण झाला असता तसेच विरोधकांचा आवाज दाबला गेला, अशी टीकाही झाली असती. त्यामुळे सरकार अत्यंत धाडसाने या ठरावाला सामोरे जाणार असे दिसते. मोदी यांचा तसा आत्मविश्वासही दिसत होता. केंद्र सरकारवर असा हा ठराव नवीन नाही. यापूर्वी अनेकदा असे ठराव आले आहेत पण या ठरावाचे अस्त्र जबरदस्त आहे. कारण त्यातून सरकारला घरी जाण्याची वेळ देखील येऊ शकते. याअगोदर असे अनेक प्रसंग घडले आहेत. चार वर्षांपूर्वी २०१८ साली तेलुगू देसम पक्षाने मोदी सरकारविरोधात अविश्वास ठराव मांडला होता. २०१८ साली मोदी सरकारला अविश्वास ठरावामुळे कोणताही धोका निर्माण झाला नाही आणि यावेळी देखील बहुमताच्या आकड्याहून अधिक खासदार असल्यामुळे सरकारला कोणताही धोका नाही. मोदींना फक्त मणिपूरच्या विषयावर बोलते करावे, यासाठीच विरोधकांनी सदर प्रस्ताव मांडला. इतिहासात आतापर्यंत २६ वेळा अविश्वास प्रस्ताव मांडण्यात आले आहेत, ज्यामध्ये तीन वेळा सरकारच्या विरोधात मतदान झाल्यामुळे सत्ताधीशांना सत्तेवरून पायउतार व्हावे लागले होते. स्वातंत्र्यानंतर तिसऱ्या लोकसभेत १९६३ साली पहिल्यांदा लोकसभेत अविश्वास ठराव मांडला गेला होता. खासदार आचार्य जेबी कृपलानी यांनी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या सरकारविरोधात हा प्रस्ताव मांडला होता. या प्रस्तावावर तब्बल चार दिवसांत २१ तास चर्चा झाली. ४० खासदारांनी या ठरावावर त्यांची भूमिका मांडली. त्यावेळी



फक्त ६२ खासदारांनी प्रस्तावाच्या बाजूने तर ३४७ खासदारांनी प्रस्तावाच्या विरोधात मतदान केले होते. जनता दलाचे नेते माजी पंतप्रधान व्ही.पी. सिंह यांच्या सरकारने १९९० साली अविश्वास ठरावाचा सामना केला होता. सरकार स्थापन झाल्यानंतर केवळ ११ महिन्यातच भाजपाने राम मंदिराच्या प्रश्नावरून सरकारचा पाठिंबा काढून घेतला. त्यामुळे १० नोव्हेंबर १९९० साली व्ही. पी. सिंह यांचे सरकार कोसळले. १४२ विरुद्ध ३४६ मतांनी व्ही. पी. सिंह यांनी अविश्वास प्रस्ताव गमावला. विशेष म्हणजे काँग्रेसला सत्तेबाहेर ठेवण्यासाठी भाजपानेच व्ही. पी. सिंह यांच्या नॅशनल फ्रंट कोएलेशन सरकारला पाठिंबा दिला होता. सात वर्षांनतर जनता दलाचे नेते आणि माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांनाही अविश्वास ठरावाचा सामना करावा लागला. सरकार स्थापन झाल्यानंतर अवघ्या १० महिन्यात देवेगौडा यांना राजीनामा द्यावा लागला. १९९६ साली झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत कोणत्याही पक्षाला बहुमत प्राप्त झाले नाही. त्यामुळे काँग्रेस नेते सीताराम केसरी यांनी गौडा यांना पाठिंबा देऊन १३ पक्षांच्या मदतीने गौडा यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन केले. सत्ता स्थापन झाल्याच्या १० महिन्यानंतर ११ एप्रिल १९९७ साली अविश्वास प्रस्ताव दाखल झाल्यानंतर काँग्रेसने आपला पाठिंबा काढून घेतला आणि देवेगौडा यांचे सरकार गडगडले. अविश्वास प्रस्तावावर बहुमत गोळा करण्यात देवेगौडा अपयशी ठरले. त्यांना केवळ १५८ खासदारांचा पाठिंबा मिळू शकला. माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांना दोन वेळा अविश्वास ठरावाचा सामना करावा लागला. एकदा त्यांना अपयश आले, तर एकदा अविश्वास प्रस्ताव परतवून लावण्यात यश आले. जयललिता यांच्या अण्णाद्रमुक पक्षाने सरकारचा पाठिंबा काढून घेतल्यामुळे एप्रिल १९९९ साली वाजपेयी सरकारविरोधात पहिला अविश्वास प्रस्ताव दाखल झाला आणि सरकार पडले. त्यानंतर झालेल्या निवडणुकीत पुन्हा एकदा भाजपाचे सरकार आले. तेव्हा काँग्रेस आघाडीने २००३ साली वाजपेयी यांच्याविरोधात दुसरा अविश्वास ठराव मांडला. मात्र यावेळी भाजपा सरकारने ३१२ विरुद्ध १८६ मतांनी हा ठराव उलटवून लावला. चर्चेच्या शेवटी सभागृहात ठरावाच्या बाजूने आणि विरोधात असे मतदान घेण्यात येते. जर ठरावाच्या बाजूने मतदान झाले, तर सरकारला नियमाप्रमाणे सत्तेचा त्याग करावा लागतो. पण इथे स्थिती वेगळी आहे. मोदींकडे बहुमत आहे. ठरावाच्या चर्चेला उत्तर देताना मोदी हे विरोधकांची दमछाक करतील, असे वाटते. विरोधकांची ही नसती खुसपट आहे.

## राजकारण

# घुसखोरीचे मोठे आव्हान

बांगलादेशी नागरिकांची भारतातील घुसखोरी आजमितीला जटिल समस्या बनली आहे. बांगलादेशी घुसखोरांनी आसामच्या हजारो चौरस किलोमीटर परिसरावर अतिक्रमण केले आहे. या परिसरात कारवाईसाठी जाणाऱ्या अतिक्रमणविरोधी पथकांना आणि पोलिसांना ते जुमानत नाहीत, बांगलादेश सीमेलगतच्या सर्वच राज्यांत जवळपास अशीच परिस्थिती आहे. पश्चिम बंगाल तर बांगलादेशी घुसखोरांना आश्रय देणारे प्रमुख राज्य मानले जाते. अर्थात हे बांगलादेशी अधिककाळ या सीमेलगतच्या भागात राहत नाही. सीमेलगतच्या भागात या बांगलादेशींना भारतीय नागरिकत्वाची सरकारी कागदपत्रे मिळवून देणाऱ्या अनेक टोळ्या अनधिकृतरीत्या कार्यरत आहेत. सरकारी कागदपत्रे बनवल्यावर हे घुसखोर भारतभरातील प्रमुख शहरांमध्ये जाऊन आपले बस्तान मांडतात. विकसनशील शहरे हे या घुसखोरांची प्रमुख आश्रयस्थाने आहेत. विकसनशील शहरात मोठमोठ्या इमारतींची कामे सातत्याने चाललेली असतात. या ठिकाणी कमी रोजंदारीत काम करणारे बिगारी कंत्राटदारांना हवेच असतात. बांगलादेशी घुसखोर त्यांची ही गरज भागवतात. इथेच यांच्या निवाऱ्याची सोयही केली जाते. एकदा बस्तान बसले की हे लोक आपल्या संपूर्ण कुटुंबीयांना घेऊन त्या ठिकाणी येतात. नवी मुंबई, पुणे, ठाणे, मुंबई या शहरांमध्ये बांगलादेशी घुसखोरांची संख्या याच पद्धतीने वाढली आहे. पंजाब, हरियाणा आणि उत्तरेकडील काही भागांत जिथे मोठ्या प्रमाणात कॉन्ट्रॅक्ट पद्धतीने शेती केली जाते, अशा ठिकाणीही या घुसखोरांना सहज रोजगार उपलब्ध होतो. प्रमुख शहरांमध्ये या बांगलादेशी घुसखोरांना आश्रय देणाऱ्या, त्यांना रोजगार उपलब्ध करून देणाऱ्या आणि व्यवसायासाठी भांडवल मिळवून देणाऱ्या टोळ्याही कार्यरत आहेत. आजच्या घडीला मुंबई शहरातील बहुतांश रेल्वे स्थानकानजीकच्या मंड्यांमध्ये घुसखोरांनी अनधिकृत टपऱ्या थाटल्या आहेत, ज्यांना स्थानिक लोकप्रतिनिधी, भ्रष्ट पोलीस अधिकारी आणि पालिका कर्मचारी यांच्याकडून संरक्षण मिळते आहे.

**महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्यात गेल्या काही वर्षांत ५ हजारहून अधिक बांगलादेशी कुटुंबासह वास्तव्यास असल्याची धक्कादायक माहिती गुप्तचर यंत्रणेच्या सर्वेक्षणातून उघड झाली आहे. गेल्या तीन वर्षांत त्यापैकी केवळ ५ बांगलादेशींना पुन्हा मायदेशी पाठवण्यात पोलिसांना यश आले आहे. बांगलादेशी नागरिकांची भारतातील घुसखोरी हळूहळू उग्र स्वरूप धारण करू लागली आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर फ्रान्सने त्याच्या सीमा शरणार्थींसाठी खुल्या केल्या होत्या. त्याचे परिणाम म्हणून ४० वर्षांनंतर फ्रान्समध्ये मोठ्या प्रमाणात दंगली उसळल्या. भारतातील घुसखोरीवर आज गांभीर्याने उपाययोजना केल्या नाहीत तर भविष्यात भारतालाही अशा प्रकारच्या संकटाला सामोरे जावे लागू शकते.**

भारत आणि बांगलादेश यामधील सुमारे २८०० किलोमीटर सीमेवर भारताने काटेरी तारांचे कुंपण बसवले आहे, तरीही आजतागायत ६ कोटींहून अधिक बांगलादेशी नागरिकांनी भारतात घुसखोरी केल्याचा अंदाज जाणकार वर्तवतात. एवढ्या मोठ्या प्रमाणात घुसखोरी होत असताना सीमा सुरक्षा दलातील अधिकारी काय करत आहेत? याचीही चौकशी होणे गरजेचे आहे. आज भारतातील मुस्लिमांची श्रद्धास्थाने असलेल्या मशिदी आणि दर्गे यांच्या उत्सवांच्या निमित्ताने भारतात येणाऱ्या



बांगलादेशींपैकी अनेक जण पुन्हा त्यांच्या देशात जातच नाहीत, असेही आता उजेडात आले आहे. लोकसंख्येच्या बाबतीत नुकतेच भारताने चीनला मागे टाकून जगात पहिला क्रमांक पटकावला, ज्यामध्ये दुर्दैवाने बांगलादेशी घुसखोरांचाही महत्त्वाचा वाटा आहे.

भारतातील गुन्हेगारी क्षेत्रातही बांगलादेशी घुसखोरांचा मोठ्या प्रमाणात भरणा आहे. भारतात राहून देशविरोधी कारवाया, अंमली पदार्थांची तस्करी, दंगली घडवणे, लूटमार करणे, भूखंड बळकावणे यांसारख्या गुन्ह्यांमध्ये बांगलादेशी नागरिक पोलिसांच्या हाती सापडत आहेत. झोपडपट्टी दादा, लोकप्रतिनिधी आणि दलाल यांच्या मदतीने या घुसखोरांच्या निवाऱ्याची आणि रोजगाराची सोय होते. काही दिवसांतच त्यांना बनावट मतदान ओळखपत्र, रेशनकार्ड बनवून मिळते. त्यामुळे बांगलादेशी असल्याचा संशय असूनही त्यांच्यावर कारवाई करणे पोलिसांना अवघड जाते. खरेतर बांगलादेशी नागरिकांची घुसखोरी रोखावी यासाठी विशेष शोधमोहीम प्रत्येक पोलीस ठाण्याअंतर्गत राबवण्यात यावी, असे पोलिसांना आदेश आहेत. यामध्ये बांगलादेशी व्यक्ती शोधणे, त्यांच्या कागदपत्रांची पडताळणी करणे, त्यांचे साथीदार शोधणे तसेच त्या सर्वांना परत पाठवणे आदी कामे येतात; मात्र या सर्वांत अधिक वेळ जात असल्याने या आदेशाला पोलिसांकडूनच केराची टोपली दाखवली जात आहे.

एक सेक्युलर देश म्हणून युरोपमध्ये फ्रान्सचे उदाहरण दिले जाते. दुसऱ्या महायुद्धानंतर फ्रान्सने आपल्या सीमा शरणार्थींसाठी खुल्या केल्या होत्या. त्याचे विघातक परिणाम फ्रान्स आता भोगत आहे. फ्रान्समध्ये उसळलेल्या दंगली या त्याच्या या चुकीच्या निर्णयाचीच विषारी फळे आहेत. भारतातही बांगलादेशी आणि रोहिंग्याची घुसखोरी प्रचंड प्रमाणात वाढलेली आहे. सरकारने आज याकडे गांभीर्याने पाहिले नाही तर भविष्यात फ्रान्ससारखी स्थिती भारतावरही उद्‌भवू शकते. बांगलादेशी घुसखोरांना वेचून त्यांवर हकालपट्टीची कारवाई करण्यासंदर्भात केंद्र सरकारने ठोस धोरण आखून त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करायला हवी. घुसखोरांना आश्रय देणाऱ्या, त्यांच्या रोजगाराची, निवासाची आणि सरकारी कागदपत्रांची सोय करणाऱ्या भारतीयांवर देशद्रोहाच्या गुन्ह्याअंतर्गत कारवाई करण्यात यावी, त्याशिवाय हे सर्व थांबणार नाही.

**- जगन घाणेकर, मुंबई.**

## टुडेज् ब्लॉग

# धिंड तिची की तुमची?

सध्या गल्लीपासून दिल्लीच नाही तर परदेशातही मणिपूरमध्ये घडलेल्या भयानक घटनेचीच चर्चा आहे. कुकी जमातीच्या तीन आदिवासी महिलांना विवस्त्र करून त्यांची धिंड काढून त्यांच्यावर लैंगिक अत्याचार करणाऱ्या मैतेई समाजाविरोधात जनक्षोभ उसळला आहे. आरोपींवर कडक कारवाई करण्याची मागणी होत आहे. या घटनेची दखल थेट सर्वोच्च न्यायालयाने घेतल्याने खडबडून जागे झालेल्या मणिपूर सरकारने तब्बल घटनेच्या ७७ दिवसांनंतर याप्रकरणी दोन जणांना अटक केली आहे. उद्या त्यांच्यावर कारवाईही होईल. पण ज्या महिलांची वस्त्र फाडून नग्न धिंड काढण्यात आली, त्यांच्यावर कल्पनेच्या पलिकडे जाऊन लैंगिक अत्याचार करण्यात आले त्यांचे काय?

आरोपींना शिक्षा झाल्याने या महिलांच्या शरीरावर आणि मनावर झालेल्या जखमांचे काय? आणि व्हायरल व्हिडिओत या महिलांची अवस्था बघून आतल्याआत संतापाने पेटून उठलेल्या माझ्यासारख्या महिलांचं काय? अजून किती वर्षे हे चित्र पाहायचं आम्ही, किती वर्षे फक्त महिला असल्याची किंमत द्यायची आम्ही. युद्ध असो, राजकारण असो किंवा जातीयवाद प्रत्येकवेळी स्त्रियांवर अत्याचार करुनच का हा राक्षसी प्रवृत्तीचा अहंकार शांत होतो?

हजारो लोकांसमोर जेव्हा या महिलांना विवस्त्र करण्यात येत होतं, त्यांच्या शरीराबरोबर खेळलं जात होतं तेव्हा तिथल्या एकाही पुरुषाला त्याच्या आया बहिणींची आठवण झाली नसेल. एकानेही त्या नराधमांना अडवायचा तरी का प्रयत्न केला नाही? जमावापुढे हतबल झालेले पोलीस तर बघ्याच्या भूमिकेत होते. म्हणजे समोर रक्षक असूनही महिला असुरक्षितच!

हींच देशातील आजची सत्य परिस्थिती आहे. कोणी तिचे प्रेमाच्या नावाखाली तुकडे करून कुत्र्यांना खाऊ घालतोय. तर कोणी बलात्कार करुन तिला जिवंत जाळतोय. कोणी तिला ब्लॅकमेल करतोय. तर कोणी तिला सोडून देतोय. कोणी तिला प्रेमात भुलवून परदेशात विकतोय. तर जन्मदाता बापच तिचे लैंगिक शोषण करतोय. महिला सुरक्षित राहतील असं



एकही ठिकाणं या देशात उरलं नाही का? की या समाजाला तसं ठिकाण निर्माणच करायचं नाहीये. गर्दीला चेहरा नसतो असं म्हणतात. पण त्याच गर्दीत कोणाचा बाप, कोणाचा नवरा, कोणाचा मुलगा, काका, मामा आजोबा तरी असू शकतो ना. की त्या क्षणाला सगळ्याच पुरूषांच्या शरीरात पशू प्रवेश करतो. किती हा मानसिकतेचा, द्वेषाचा कळस.

वाद दोन समुदायांमधला. पण त्याची किंमत मात्र त्या त्या समुदायातील महिलांना द्यावी लागतेय. कायद्याची जरब राहिली नाही की पोलिसांचा धाक.


मग जगभरात आपण का ढिंडोरा पिटतोय की, 'मुलगी शिक्षित तर घर सुशिक्षित' अरे थांबवा आता हे. भारताचा तालिबान होतोय.. आपला देश पुढे नाही मागे जातोय, हींच प्रतिमा बनतेय जगभरात माझ्या देशाची.

निर्भया प्रकरणामुळे संपूर्ण जगाचा भारतीय पुरुषांकडे बघण्याचा दृष्टीकोनच बदलला होता. रेपिस्ट म्हणूनच त्यांना हिणवलं जातं होत. याच घटना जगात देशाची प्रतिमा घडवतात आणि बिघडवतात. यामुळे नक्की कोणाला सुधरावयाचे समाजाला, येथील पुरुषांना की येथील पुरुषी मानसिकतेला? यावर वेळींच उपाययोजना केल्या नाहीत तर मुलीचा जन्म हा शापचं समजला जाईल आणि पूर्वीप्रमाणेच मातेच्या गर्भातच उमळत्या कळ्यांना कुस्ककरलं जाईल.

**- कविता जोशी-लाखे.**

## जन्म हा अखेरचा

## भावार्पितस्थल



तो मोजत असताना तुम्हीही लक्ष ठेवून असता-बरोबर मोजतो की नाही? त्याने नीट मोजले आहे, हे माहीत असताना हाती घेतल्यावर तुम्ही स्वत: नोटा मोजून पाहता. कुणाला पैसे देताना त्याच्यासमोर नोटा मोजून देता. घेणारा पुन्हा त्या नोटा मोजून पाहतो. किती तन्मयता आहे ही! तुमचे नोटांवर अधिक प्रेम असते हेच याचे कारण आहे. सांसारिक वस्तूंसंबंधी आपली भावना अशीच असते. परंतु सांसारिक वस्तू फार काळ आपल्याला सुख देऊ शकत नाहीत. म्हणून त्यांना आपली भावना अर्पण करण्यापेक्षा सुखरूप अशा परमात्म्याला निश्चलतेने भावार्पण केले पाहिजे.

**चित्तस्थसकलार्थांनां मननं यत्तु मानसे ।**
**तदर्पणं शिवे साक्षान्मानसो भाव उच्यते ।।(१७.५१)**

मनात पदार्थांचे अनुभवरुपाने चाललेले चिंतन म्हणजे भाव होय. सांसारिक पदार्थांचे मन चिंतन करीत असते. हेच चिंतन संसाराकडून भगवान शिवाकडे वळवायचे असते. मनाचा संसाराशी असलेला संबंध किती जुना आहे, याची आपल्याला कल्पना नाही. किती वर्षे होऊन गेलीत, किती युगे उलटून गेलीत, किती जन्म घेऊन झाले कुणास ठाऊक! सृष्टीच्या आरंभापासून जीवात्मा जन्म घेत आला असून त्याच्या मनाचा संसाराशी संबंध जुळलेला आहे. संसाराचा त्याग करुन जेव्हा अक्कमहादेवी बाहेर पडली तेंव्हा तिच्या मार्गात काम, क्रोधादी विकार उभे राहिले. तेव्हा ती म्हणाली, 'हे लोभ, मला जाऊ दे, मी परमात्म्याकडे एक पत्र घेऊन चालले आहे म्हणून माझी वाट सोड. मी जाऊन परत येईन तेव्हा तुमच्याशी व्यवहार करीन. परंतु ती अशा ठिकाणी निघाली होती की जेथून कधींच परत येणार नव्हती.'


जेव्हा असा प्रसंग तुमच्यावर येईल, तेव्हा तुम्ही सावध राहिले पाहिजे. सत्कर्म करायचे असेल तर त्वरित करावे. शुभस्य शीघ्रम्. परंतु दुष्कर्म दाराशी आले असेल तर त्याला पुन्हा 'उद्या ये' म्हणावे. दारात बोर्डच टांगून ठेवावा, 'उद्या ये'. ही 'उद्या' कधींच उजाडणार नाही. काम, क्रोध, लोभ इत्यादींना आपण एक नव्हे तर अनेक जन्मांत आपली भावना समर्पित केली आहे.

**(क्रमश:) – काशी जगद्‌गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

## जनमानस

### 'कणेकरी'ला पूर्णविराम

नुकतेच शैलीदार लेखक, पत्रकार आणि फिल्मी गप्पाष्टकांची मैफल रंगवणारे बहारदार वक्ते शिरीष कणेकर यांचे वयाच्या ८० व्या वर्षी निधन झाले. सिनेमा, क्रिकेट आणि राजकारण या विषयांवरील त्यांचे लेखन प्रसिद्ध होते. माझी फिल्लमबाजी', 'कणेकरी' ही पुस्तके आणि कथाकथनाचे त्यांचे कार्यक्रम लोकप्रिय झाले होते. आपल्या खास शैलीतून टोकदार लिखाण करणाऱ्या आणि समस्यावर विनोदी शैलीतून बोट ठेवणारे लेखक शिरीष कणेकर हे आता काळाच्या पडद्याआड गेले आहेत. इंडियन एक्प्रेस, डेली, फ्री प्रेस जर्नल, सिंडिकेटेड प्रेस न्यूज एजन्सी यासाठी शिरीष कणेकरांनी काम केलं. लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स, लोकमत, सामना, पुढारी, साप्ताहिक मनोहर, साप्ताहिक लोकप्रभा, साप्ताहिक प्रभंजन, पाक्षिक प्रभंजन, पाक्षिक चंदेरी, साप्ताहिक चित्रानंद, सिंडिकेटेड कॉलम, द डेली आदी वृत्तपत्रांसाठी त्यांनी स्तंभलेखन केले आहे. यादो की बारात', शिरीषासन', सिनेमाबाजी', मुद्दे आणि गुद्दे', चहाटळकी', सूर पारंब्या', कणेकरी', लगाव बत्ती', आसपास', मेतकूट', चित्ररुप', फिल्लमबाजी', कल्चर व्हल्चर' या नावांनी ते स्तंभलेखन करत. तिरकस लिहिणं आणि जोरकसपणे मुद्दे मांडणं हे त्यांच्या लेखन शैलीचे वैशिष्ट्य. क्रिकेट, मनोरंजन विश्व आणि राजकारण हे तिन्ही त्यांचे आवडीचे विषय होते. 'लगाव बत्ती' या शिरीष कणेकर यांच्या कथा संग्रहाला महाराष्ट्र साहित्य परिषदेचा आणि उत्कृष्ट विनोदी वाङ्मयाचा चिं. वि. जोशी पुरस्कारही मिळाला होता. क्रीडा आणि सिने-पत्रकारितेवर त्यांनी विपुल लेखन केले असून त्यांच्या जाण्याने नर्मविनोदी आणि कलासक्त व्यक्तिमत्व हरपले आहे.



**- प्रा. विजय कोष्टी, सांगली.**

### ...आता गरिबांना अवघड

देशातील आमदारांच्या संपत्तीबाबत नुकतेच वाचण्यात आले. देशातील एकूण आमदारांची सरासरी संपत्ती १३. ६३ कोटी आहे. विशेष म्हणजे देशातील ८८ आमदारांकडे १०० कोटीपेक्षा जास्त संपत्ती आहे. एका आकडेवारीनुसार कर्नाटकचे डिके शिवकुमार यांची संपत्ती १४१३ कोटी रुपये तर अपक्ष आमदार के. एच. गोवडा यांची संपत्ती १२६७ कोटी रुपये आहे. काँग्रेस पक्षाचे आमदार प्रियाकृष्णा यांची संपत्ती ११५६ कोटी रुपये आहे. ज्यांची संपत्ती १०० कोटींच्या वर आहे, असे काँग्रेस पक्षाचे ३३ आमदार तर भाजपचे २४ आमदार आहेत. एकूणच आता बहुसंख्य आमदारांची संपत्ती ही अनेक कोटींच्या घरात आहे. तरीही त्यांना अनेक लाभ उदा. पेन्शन इत्यादी मिळतातच. एवढी कोटींची संपत्ती असताना कोणी पेन्शन नाकारली असे अगदी हाताच्या बोटावर मोजण्या इतकेच आमदार असतील. स्वातंत्र्योत्तर काळात अनेक आमदार सर्वसामान्य जनतेतून वर आले होते. कित्येक जण त्यावेळी एसटीतून प्रवास करत होते. आज चित्र पालटले आहे. जो जास्त पैसेवान, तोच निवडणुकीला उभा राहतो व निवडून येतो या करोडोपती आमदारांच्या विरुद्ध उभे राहणे म्हणजे निवडणुकीत अपयश आल्यासारखेच आहे. यामुळे आजकाल शिक्षित, साहित्यिक छोटे व्यावसायिक निवडणुकीच्या फंदातच पडत नाहीत.

**- शांताराम वाघ, पुणे.**

# शहरी बेगडीपणाचा शेतीवर घाला

शेतीतील जनतेला शहरी वातावरणाचे आकर्षण दिवसेंदिवस वाढू लागल्यामुळे शेतीमध्ये काबाडकष्ट करण्याचे प्रमाण कमी झाले. आज स्वतःच्या शेतीमध्येही कामासाठी उतरताना युवा पिढीला कमीपणा वाटू लागला. त्यामुळे छोट्या मोठ्या पण कपडे खराब न होणाऱ्या इतर उद्योगांकडे पूर्वीच्या शेतीत कष्ट करणारे लोक वळाले. आज गावातील मोठ्या कुटुंबातील मोठा शेतकरीदेखील घरातील तरुण पिढीला तुम्ही शेतीमध्ये काम करा, हे अतिशय आग्रहाने म्हणू शकत नाही. कारण आजच्या शहरी भागातील बेगडीपणा लहान लहान खेड्यापाड्यांपर्यंत पोहचला आहे.

शेतीमध्ये पेरणीपासून मळणीपर्यंत विविध प्रकारची कामे करावी लागतात. या कामांसाठी घरातील सदस्य तसेच मोबदला घेऊन कामे करणारे शेतमजूर यांची म्हणजेच मनुष्यबळाची मोठ्या प्रमाणावर टंचाई जाणवते. ही आजच्या युगातील शेती क्षेत्रासमोरील मोठी समस्या आहे. ग्रामीण भागात मोठे कुटुंब असणारा शेतकरी आपल्या शेतीतील बरीचशी कामे घरातील सदस्यांच्या साहाय्याने पूर्ण करतो. ही परिस्थिती गेल्या काही वर्षांपर्यंत अस्तित्वात होती, पण आज घरातील अनेक सदस्य शेतीत काम करण्यास उत्सुक दिसत नाहीत. याची दुसरी बाजू म्हणजे मजुरी देऊन शेतीची कामे शेतमजुरांकडून करून घेता येतात, परंतु आजच्या काळात शेतमजुरांकडून पैसे देऊन कामे करून घेण्यापेक्षा त्यांची उपलब्धता होण्यातच अनेक अडचणी येतात. थोडक्यात भारत जगात लोकसंख्येत आज क्रमांक एकचे राष्ट्र असले तरी शेतीमध्ये काम करण्यासाठी मनुष्यबळाची अडचण मोठ्या प्रमाणावर शेती क्षेत्राला भेडसावत असल्याची वस्तुस्थिती आपणास दिसून येते.

काही वर्षांपूर्वी मजुरीच्या मोबदल्यात दुसऱ्याच्या शेतीवर काम करणारा शेतमजुरांचा वर्ग आज इतर अनेक पर्यायी उद्योग व्यवसायांकडे वळल्याचे दिसून येते. त्यामुळे शेतीतील कामासाठी मनुष्यबळाची अडचण निर्माण होते. स्वातंत्र्योत्तर कालखंडात शेतीपूरक व्यवसायांचा मोठ्या प्रमाणावर विकास झाला. त्यात पशुपालन, कुक्कुटपालन, दुग्ध व्यवसाय, लोकर कमावणे इत्यादी व्यवसायांमध्ये पूर्वी शेतमजूर असणारे लोक आता आले आहेत.



राष्ट्राच्या, राज्याच्या प्रगतीबरोबरच ग्रामीण भागात कुटीर उद्योगांचा विकास मोठ्या प्रमाणावर झाला. त्यात टोपल्या, सूप, दोरखंड, झाडू, घोंगड्या बनविणे या उद्योगांमध्ये मोठ्या प्रमाणावर लोकसंख्या गुंतल्याचे दिसून येते. शासनाने कल्याणकारी राज्याची संकल्पना राबवताना त्यातील एक भाग म्हणजेच औद्योगीकरण ग्रामीण भागापर्यंत पोहचवले. नवनवीन औद्योगिक वसाहती मोठ्या प्रमाणावर स्थापन होऊ लागल्या आणि होत आहेत. त्या कारखान्यांमध्ये कुशल कामगारांबरोबर अकुशल कामगारांची मोठ्या प्रमाणावर भरती झाली. शेतमजूर म्हणून काम करणारी फार मोठी लोकसंख्या आता इकडे वळली. तेवढ्या संख्येने शेतीवर काम करणाऱ्या मजुरांची संख्या कमी झाली.

लहान दुकाने, किराणा, कापड, सायकल, मोटरसायकल, चारचाकी वाहने रिपेअर करणे, आईस्क्रीम पार्लर, पिठाची गिरणी, बहुउद्देशीय सभागृह, विविध शाळांमध्ये आणि इतर ठिकाणी शिपाई म्हणून काम करणे, बगीचाची कामे, दुसऱ्यांच्या दुकानात पडेल ती कामे करणे, मोठ्या असामींच्या घरात घरगुती कामे करणे, सिक्युरिटी म्हणून अनेक ठिकाणी कामे करणे या आणि यांसारख्या अनेक क्षेत्रांत कुशल तसेच अकुशल कामगारांना मोठ्या संधी निर्माण झाल्या. शेतमजूर म्हणून काम करताना करावे लागणारे कष्ट आणि या विविध क्षेत्रांत काम करीत असताना करावे लागणारे कष्ट यात तफावत असल्यामुळे शेती क्षेत्रातील मनुष्यबळ इतरत्र वळताना दिसून येते.

शेतीतील जनतेला शहरी वातावरणाचे आकर्षण दिवसेंदिवस वाढू लागल्यामुळे शेतीमध्ये काबाडकष्ट करण्याचे प्रमाण कमी झाले. आज स्वतःच्या शेतीमध्येही कामासाठी उतरताना युवा पिढीला कमीपणा वाटू लागला. त्यामुळे छोट्या मोठ्या पण कपडे खराब न होणाऱ्या इतर उद्योगांकडे पूर्वीच्या शेतीत कष्ट करणारे लोक वळले. आज गावातील मोठ्या कुटुंबातील मोठा शेतकरीदेखील घरातील तरुण पिढीला तुम्ही शेतीमध्ये काम करा, हे अतिशय आग्रहाने म्हणू शकत नाही.

कारण आजच्या शहरी भागातील बेगडीपणा लहान लहान खेड्यापाड्यांपर्यंत पोहचला आहे. आज पैसे कमी मिळाले तरी चालतील पण शान कमी व्हायला नको ही मनोवृत्ती आपल्या युवकांची झाली आहे. त्यामुळे फार मोठी लोकसंख्या असूनही शेतीवर काम करण्यास लोक उत्सुक दिसत नाहीत. याला कारणीभूत आहे तो आपला दृष्टिकोन. याच दृष्टिकोनात बदल होणे काळाची गरज आहे.

**- प्रा. डॉ. कृष्णा शहाणे.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.



## विडी कामगार महिलांच्या कलेला तोड नाही : जयश्री माने

### महिलांच्या विडी वळणे स्पर्धेस प्रतिसाद

**सोलापूर** : सोलापूर शहरात विडी कामगार महिलांची संख्या मोठी असून या महिलांचा विडी बनवणे हा मुख्य व्यवसाय झाला आहे. त्या कधीं हाताला व शरीराला विश्रांती देत नाहीत. त्यांच्या विडी करण्याच्या कौसल्याचे कौतुक करावे तेवढे थोडेसे असल्याचे ब्रह्मदेवदादा माने शिक्षण संकुलाच्या सचिवा जयश्री माने यांनी सांगितले.

दिलीप माने वाढदिवस गौरव समितीच्या वतीने निलमनगर येथील वदुर्गा देवस्थानमध्ये आयोजित केलेल्या महिलांची विडी वळणे स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभात त्या बोलत होत्या. यावेळी सचिन गंधुरे, पाडूरंग कदम,देवा विटकर,अनिल जमादार,पवन देसाई, सतीश संगा,शिवानंद बरुळगी,वसुंधरा कुलकर्णी,दुर्गदास चिलवेरी,व्यंकटेश रच्चा, नरेंद्र क्षिरसागर, परिक्षक अमोल शामल, यादगिरी येमुल, अशोक सामल, जयराम संचु आदी मान्यवर उपस्थित होते. शारदा गोविंद गडगी यांनी एका तासात ३२८ विडी बनवून प्रथम क्रमांक व ज्योती पांडुरंग बुर्ला द्वितीय अनिता मड्डी या तृतीय बक्षिसाचे विजेत्या ठरल्या. याशिवाय उत्तेजनार्थ दहा बक्षिसे देण्यात आली कार्यक्रमाचे संयोजन सौ.रंजना क्षिरसागर,सौ. मंजुश्री भोसले यांनी तर सूत्रसंचालन वर्षा मोरे यांनी केले.



## उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसेनेकडून लाडू वाटप


**सोलापूर** : शिवसेना पक्षप्रमुख महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त प्रभाग क्र ५ मधे मराठी शाळेतील लहान मुलांना लाडू व खावू वाटप करण्यात आले. शिवसेना शहर संघटक अतुल भवर यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम राबविण्यात आला यावेळी मुख्याध्यापक भाग्यवंत,अंबूरे,दिपक भोसले, गणेचारी उपस्थित होते.



## नवभारत साक्षरता कार्यक्रम प्रभावीपणे राबवा : तहसीलदार

**सोलापूर** : शासनाने १५ वर्षापुढील निरक्षरांना साक्षर बनवण्याकरिता नवभारत साक्षरता कार्यक्रम हाती घेतला आहे. या कार्यक्रमाची दक्षिण सोलापूर तालुक्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करा असे आवाहन तहसीलदार व नियामक परिषदेचे अध्यक्ष राजशेखर लिंबारे यांनी केले. दक्षिण सोलापूर तालुका नियामक परिषदेची बैठक झाली या बैठकीत लिंबारे बोलत होते. यावर पुणे विभागीय उपसंचालक (योजना) राजशेखर क्षीरसागर, शिक्षणाधिकारी (योजना) सुलभा वठारे, नियामक परिषदेचे सचिव व गटशिक्षणाधिकारी मल्हारी बनसोडे उपस्थित होते. राजेश क्षीरसागर यांनी मार्गदर्शन करताना म्हणाले नरक्षरांचा शोध घेऊन त्यांना अध्यापन करून साक्षर बनवायचे आहे. साक्षर झाल्यानंतर त्यांना प्रमाणपत्र देऊन त्यांचा गुणगौरव करायचे आहे. सुलभा वठारे म्हणाल्या की, दक्षिण सोलापूर तालुक्याला १५१५ इतके उद्दिष्ट देण्यात आले आहे. त्यानुसार महसूल गावनिहाय उद्दिष्ट ठरवून कार्यवाही करावी. मल्हारी बनसोडे यांनी दक्षिण सोलापूर तालुक्यातील महसूल गावनिहाय उद्दिष्टानुसार स्वयंसेवकाची नियुक्ती करणे व त्यांना प्रशिक्षण देऊन दक्षिण सोलापूर तालुक्याचे काम यशस्वीरित्या पूर्ण करू असे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मल्हारी बनसोडे तर आभार जयश्री सुतार यांनी केले.

## शिवानंद पाटील यांचे निधन



**सोलापूर** : कुमठे (ता. अक्कलकोट) येथील शिवानंद नागप्पा पाटील यांचे दि. गुरुवार दि. २७ जुलै रोजी सायंकाळी पाच वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या अंत्यसंस्कार दि. २८ जुलै रोजी कुमठे येथील शेतात दुपारी एक वाजता होणार आहे. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. सोलापुर मार्केट यार्डातील कांदा व्यापारी सुधाकर पाटील यांचे लहान बंधू होत.

# एकही बालक लसीकरणापासून वंचित राहणार नाही : जिल्हाधिकारी

सुराज्य/सोलापूर

विशेष मिशन इंद्रधनुष ५.० अंतर्गत जिल्ह्याच्या नागरी व ग्रामीण भागात पुढील तीन महिन्यात झिरो ते दोन वर्ष, दोन ते पाच वर्षे वयोगटातील एक ही बालक तसेच गर्भवती महिला लसीकरणापासून वंचित राहणार नाही. यासाठी आरोग्य यंत्रणेने योग्य ती दक्षता घ्यावी अशा सूचना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद केल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित विशेष मिशन इंद्रधनुष ५.० अंतर्गत नियमित लसीकरणाच्या अनुषंगाने आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे, जिल्हा माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. अनिरुद्ध पिंपळे, जागतिक आरोग्य संघटनेचे प्रतिनिधी डॉ. अमोल गायकवाड, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत कुलकर्णी, जिल्हा साथरोग अधिकारी बिरदेव दुधभाते यांच्यासह सर्व संबंधित सदस्य उपस्थित होते.

ग्रामीण व शहरी भागातील सर्व बालक व गर्भवती महिला यांचे लसीकरण शंभर टक्के होईल त्यासाठी सूक्ष्म नियोजन करावे. आतापर्यंत एकही डोस न घेतलेले बालक तसेच अर्धवट डोस राहिलेले बालक यांचा शोध घेऊन त्या सर्वांचे लसीकरण करावे. ही मोहीम महानगरपालिका क्षेत्र व नगरपालिकेच्या क्षेत्रात अत्यंत प्रभावीपणे राबवण्यासाठी संबंधितांनी दक्षता घेण्याच्या सूवना जिल्हाधिकारी यांनी यावेळी दिल्या.

मिशन इंद्रधनुष्य अंतर्गत ग्रामीण भागातील बालके व गर्भवती महिलांना या मोहिमेच्या कालावधीत १०० टक्के लसीकरण करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने प्रयत्न करावेत असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी केले.

### असा आहे नियोजन

लाभार्थ्यांची निवड ही झिरो ते दोन वर्षे वयोगटातील लसीकरणापासून वंचित किंवा गळती झालेल्या लाभार्थ्यांचे सर्व लसीद्वारे लसीकरण करणे, दोन ते पाच वर्षे वयोगटातील ज्या बालकांचे गोवर रूबेला लसीचा पहिला व दुसरा डोस राहिला असेल तसेच डीपीटी ओरल पोलिओ लसीकरण बुस्टर डोस राहिला असेल त्यांचे लसीकरण करणे आणि गर्भवती महिला यांचे लसीकरण करणे या पद्धतीने होणार आहे. तसेच ६ ऑगस्ट २०१८ किंवा त्यानंतर जन्मलेल्या बालकांचा या मोहिमेमध्ये समावेश असणार आहे.

### तीन महिन्यांची मोहीम

जिल्ह्यात तीन महिन्यात मोहिम राबवण्यात येणार आहे. पहिला महिना१२ ऑगस्ट रोजी , दुसरा महिना ११ ते १६ सप्टेंबर कलावधित तिसरा महिना ९ ते १४ ऑक्टोबर कालावधी राबवण्यात येणार आहे. प्रत्येक महिन्यात सहा कामकाजाच्या दिवसांमध्ये राबवण्याचे नियोजित आहे. ही मोहीम जिल्ह्यात प्रभावीपणे राबवण्यासाठी आरोग्य यंत्रणेची तयारी झालेली असून सर्व संबंधित विभागाच्या सहकार्याने सर्व बालकांचे लसीकरण करण्याचे नियोजन आले असल्याची माहिती जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. पिंपळे यांनी दिली.



## वृत्तपत्रातील सर्व घटकांसाठी स्वतंत्र कल्याणकारी मंडळ करावे

### वृत्तपत्र एजंट व विक्रेता संघटनेच्या वतीने निवेदन

सुराज्य/मंगळवेढा

वृत्तपत्र विक्रेत्यांच्या अडचणी व इतर प्रश्नासाठी सोडवणूक करावी,व वृत्तपत्र विक्रेत्यांसह वृत्तपत्र व्यवस्थेतील सर्व घटकांसाठी स्वतंत्र कल्याणकारी मंडळ कार्यान्वित करण्यासाठी मंगळवेढा तालुका वृत्तपत्र एजंट व विक्रेता संघटनेच्या वतीने अध्यक्ष विजय भगरे यांच्या नेतृत्वाखाली मागण्याचे निवेदन तहसीलदारांना देण्यात आले.

या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, राज्यात तीन लाख च्या आसपास वृत्तपत्र विक्रेते असून वृत्तपत्र विक्रेत्यासह वृत्तपत्र व्यवस्थेतील सर्व कर्मचाऱ्यांसाठी एकत्रित स्वतंत्र कल्याणकारी मंडळ स्थापन करून मंडळ कार्यरत करणे, वृत्तपत्र विक्रेते व व्यवसायातील सर्व कर्मचाऱ्यांनी असंघटित कामगार व नोंदणी सूरू कराव्यात, गटई कामगाराप्रमाणे मोक्याच्या ठिकाणी स्टॉल उपलब्ध करून द्यावे आधीं मागण्या या निवेदनात नमूद केल्या. यावेळी सकाळचे बातमी बातमीदार दावल इनामदार, बाळासाहेब नागणे, माणिक घुले, परमेश्वर कलुबर्मे, अजय भगरे,हुकूम मुलाणी, प्रथमेश नागणे,बिराप्पा भंडगे आदी उपस्थित होते.

# पावसात विजापूर वेस, किडवाई चौकातील अतिक्रमण काढले

सुराज्य/सोलापूर

महापालिकेच्या अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने गुरुवारी भर पावसात विजापूर वेस परिसरातील कल्याणी टॉवर येथील अपार्टमेंटच्या बाजूस रहदारीस अडथळा ठरणारी एक भिंत पाडण्यात आली. तसेच तीन खोके, भजींची चार चाकी गाडी, इतर साहित्य जप्त करण्यात आले.

सोलापूर महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त मच्छिंद्र घोलप यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात विविध ठिकाणी रहदारीस अडथळा ठरणारे व फुटपाथ वरील अतिक्रमण हटविण्याची मोहीम नियमितपणे सुरू आहे. दरम्यान, आज गुरुवारी कल्याणी टॉवर ते किडवाई चौक पर्यंत महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख जगन्नाथ बनसोडे यांच्या माध्यमातून भर पावसात बेधडक कारवाई करण्यात आली.





प्रारंभी कल्याणी टॉवर शेजारील अपार्टमेंटच्या बाजूला एक भिंत पाडण्यात आली. त्यानंतर विविध तीन खोके, चार चाकी भजीच्या गाड्या, टेबल, मोठे खोके महापालिकेच्या पथकाने जप्त केले. यावेळी येथील व्यापारी व नागरिकांनी विरोध केला. विरोधाला न जुमानता कारवाई करण्यात आली. पाऊस अधिकच असल्यामुळे तात्पुरता येथील कारवाई स्थगित करण्यात आली आहे. त्यानंतर पुन्हा शुक्रवारी ही कारवाई करण्यात येईल, असे विभाग प्रमुख जगन्नाथ बनसोडे यांनी सांगितले.

सोलापूर शहरात महापालिकेच्या जागेवर तसेच रहदारीस अडथळा ठरणारे व फुटपाथ वरील अतिक्रमण हटविण्याची मोहीम सातत्याने राबविण्यात येत आहे. स्वच्छ सोलापूर - सुंदर सोलापूर साठी नागरिकांनी महापालिका प्रशासनास सहकार्य करावे. अतिक्रमण आढळून आल्यास जप्ती व फौजदारीची कारवाई करण्यात येईल, असे आवाहन महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख जगन्नाथ बनसोडे यांनी केले आहे.

## आत्महत्येस प्रवृत्त व ॲट्रॉसिटी; उच्चन्यायालयात जामीन

सुराज्य/सोलापूर

अक्कलकोट तालूक्यातील रा.बादोला येथील मयत रमेश सखाराम माशाळे यांना आत्महत्येस प्रवृत्त व अँट्रासीटी प्रकरणी आरोपींची अटक पुर्व जामीन मे. उच्च न्यायालय मुंबई न्यायाधीश पी.डी नाईक यांनी अटकपुर्व जामीन मंजुर केले.

यात आरोपींकडुन वकीलाचा युक्तीवाद ग्राह्य धरुन उच्च न्यायालय ने आरोपींची अटकपुर्व जामीन मंजूर केल्याचे आदेश दिले.यात आरोपींतर्फे.अँड. विक्रांत फताटे,अँड.संतोष म्हमाणे,अँड. विशाल भरमशेट्टी यांनी काम पाहिले तर सरकारतर्फ अँड.दबके व मुळ फिर्यादीतर्फ सर्वजीत पाटील यांनी काम पाहिले.

# सेतू कार्यालय तत्काळ चालू करावे

### आ. शिंदे यांनी अधिवेशनामध्ये मांडली लक्षवेधी

सुराज्य/मुंबई

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनामध्ये विधानसभेत आमदार प्रणिती शिंदे यांनी सेतू कार्यालय तत्काळ सुरू करावे व संजय गांधी निराधार योजनेतील लाभार्थ्यांसाठी असलेली २१००० रुपयांच्या उत्पन्नाची मर्यादा वाढवून ५१ हजार रुपये करण्यासाठी लक्षवेधी उपस्थित केला.

१ एप्रिल २०23 पासून महाराष्ट्र राज्यामध्ये अनेक ठिकाणी सेतू कार्यालयाचे टेंडर संपल्यामुळे अचानक बंद करण्यात आले आहे. त्याठिकाणी महा-ई-सेवा केंद्र सुरु महाराष्ट्रात ठिकठिकाणी करण्यात आले आहे. त्याच्यानंतर शासनाकडून रिटेंडर करण्यात आले त्यामध्ये जाचक अटी असल्यामुळे कोणतेही कंत्राटदार पुढे आले नाही. यामुळे महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यामध्ये सेतू कार्यालय सुरु नाही. यामुळे नागरीकांना, लाभार्थ्यांना,



विद्यार्थ्यांना अनेक अडचणी निर्माण होत आहेत. सेतू कार्यालयातून ३३ रुपयांमध्ये दाखले काढून मिळत होते परंतू महा-ई-सेवा केंद्रामध्ये १००, २००, ३०० अशी रक्कम घेतली जाते. त्यामुळे एजंट पण मोठ्याप्रमाणात लाभार्थ्यांकडून पैसे घेत आहेत. त्यामुळे सेतू केंद्र सुरू करावे, अशी मागणी आ. शिंदे यांनी केली.

अनेक वर्षापासून उत्पन्न दाखल्याची जी मर्यादा २१००० रुपये ठेवली आहे, आजरोजी किमान वेतनाप्रमाणे दिवसाचा पगार ३०० रुपये आहे. आपण मनरेगामध्ये पगार २८००० वर्षाचा पगार आहे आपण आजूनही २१००० रुपये उत्पन्न मर्यादेवर अडकलो आहे, ही उत्पन्न मर्यादेची अट जी आहे ५१हजार करावी, असेही आ. शिंदे म्हणाल्या. याबाबत शासन टप्प्याटप्याने मर्यादा वाढविणार आहे. याबाबत मंत्री मंडळामध्ये लवकरात लवकर प्रस्ताव सादर करू असे मंत्र्यांनी सांगितले.

# किरण जमदाडे दक्षिण सोलापूरचे नवे तहसीलदार

सुराज्य/सोलापूर

दक्षिण सोलापूर तहसीलदार कार्यालयास अखेर अधिकारी मिळाला आहे. अमोल कुंभार यांची बदली झाल्यापासून पूर्णवेळ अधिकारी मिळाला नाही प्रभारी म्हणून राजशेखर लिंबारे यांनी काम पाहिले आखेर नियुक्तीच्या प्रतीक्षेत असलेले किरण जमदाडे यांची दक्षिण सोलापूरच्या तहसीलदार पदी नियुक्ती झाल्याने



दक्षिणचे ग्रहण सुटले आहे.

अमोल कुंभार यांच्यानंतर तहसीलदार पदी तहसीलदार उज्वला सोरटे यांची नियुक्ती झाली होती.मात्र त्यांनी पदभार घेतला नाही त्यामुळे हि जागा रिक्त होती. प्रभारी अधिकाऱ्यांवर कारभार चालू होता. मंद्रूपचे अप्पर तहसीलदार राजशेखर लिंबारे यांच्याकडे तात्पुरता पदभार होता. किरण जगदाडे यांच्या रूपात दक्षिण सोलापूर तालुक्याला पूर्ण वेळ तहसीलदार मिळाला आहे. उज्वला सोरटे यांची पुण्याच्या निवडणूक कार्यालयात बदली झाली आहे. तर सर्वसाधारण शाखेच्या तहसीलदार अंजली कुलकर्णी यांची पुणे येथे संजय गांधी निराधार योजनेच्या तहसीलदार पदी नियुक्ती करण्यात आली आहे. अप्परचिटणीस कुळ कायदा विभागातील सुनिता नेरलीकर यांची बदली कोल्हापूर जिल्हा पुरवठा सहाय्यक पदी करण्यात आली आहे. किरण जमदाडे हे उत्तर सोलापूर तालुक्यातील वडाळा गावचे रहिवासी आहेत.



## रोजगार हमी योजनेवरील कामाचा मोबदला द्या

### अन्यथा तीव्र आंदोलन कासेगाव ग्रामस्थांचा जिल्हाप्रशासानास इशारा

सुराज्य/सोलापूर

दक्षिण सोलापूर तालुक्यातील कासेगावात १२० मजुर गेली तीन वर्षापासून केलेल्या कामांचा मोबदला मिळला नाही. मजुरांनी कासेगाव ग्रामपंचायत, पंचायत समिती, तहसील कार्यालय, उपजिल्हाधिकारी कार्यालय ( रोहयो ) अशा शासनाच्या विविध कार्यालयांमध्ये निवेदनाच्या माध्यमातून पाठपुरावा केला मात्र दखल घेतली नाही त्यामुळे मजुरांनी जिल्हाधिकारी कुमार आर्शिवाद यांना निवेदन देऊन मोबदला नाही मिळाल्यास आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

कासेगावात २०२० साली रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून कामाचे नियोजन करण्यात आले होते. संजय कोंडीबा जाधव यांच्या शेतापासून ब्रम्हनाथ पाझर तलावापर्यंत नाला सरळीकरण व रुंदीकरण करणे असे कामाचे स्वरूप होते. या कामासाठी अंदाजे १५० मजुरांनी काम केले आहे. यापैकी १२० मजुरांना १८ जून २०२० पासून प्रत्येकी पाच दिवसांचा मोबदला मिळालेला नाही. गेल्या तीन वर्षापासून हे १२० मजूर पाच दिवस केलेल्या कामाच्या मोबदल्यापासून वंचित आहेत. कासेगाव ग्रामपंचायत, पंचायत समिती, तहसील कार्यालय, उपजिल्हाधिकारी कार्यालय ( रोहयो ) अशा शासनाच्या विविध कार्यालयांमध्ये निवेदन, पत्रव्यवहार याद्वारे पाठपुरावा केला दखल घेतली नाही

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी लक्ष घालून मजुरांना न्याय मिळवून द्यावा, अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा कासेगाव ग्रामस्थांच्या वतीने निवेदनाद्वारे देण्यात आला. सदर प्रकरणाची चौकशी करून मजुरांना मोबदला मिळवून देण्याचे आश्वासन जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहे. यावेळी यशपाल वाडकर, पंचायत समितीचे माजी सदस्य धनेश अचलारे, भाजप युवा मोर्चाचे तालुका उपाध्यक्ष सागर खांडेकर, राजकुमार वाडकर, उद्धव जाधव, राम चौगुले, रामा चिलदारे, अरुण जाधव, विष्णू चौगुले, वंदना ढेकळे, इंदुबाई काळे, वत्सला लबडे, भामाबाई शिंदे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# किसन जाधव यांनी बहुजन समाजाला पक्षाच्या प्रवाहात आणले : गारटकर

### अजितदादांच्या मुख्यमंत्रीपदासाठी घातले दंडवत

सुराज्य/सोलापूर

प्रचंड ध्येयवाद, अविरत कष्ट करण्याची तयारी, सामान्य माणसांविषयी वाटणारी कणव, आव्हानांना तोंड देण्याच्या वृत्तीमुळे राष्ट्रवादीचे महापालिकेतील गटनेते किसन जाधव यांनी जनमानसात आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. दुर्बल, वंचित, बहुजन समाजाला राष्ट्रवादी पक्षाशी जोडण्यात आणि पक्षाशी बांधून ठेवण्यात जाधव यांनी बजावलेल्या भूमिकेने पक्षाची ताकद आणखीन वाढली आहे. सर्वाधिक निधी मिळवून प्रभागाचा सर्वांगीण विकास त्यांनी साधला आहे, असे गौरवोद्गार पुणे राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष प्रदीप गारटकर यांनी काढले.





राष्ट्रवादीचे माजी गटनेते किसन जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त प्रभाग क्रमांक २२ येथे इच्छा भगवंताची स्पोर्ट्स क्लब आणि किसन जाधव मित्र परिवाराच्यावतीने आयोजित केलेल्या सत्कार सोहळ्यात गारटकर बोलत होते. यावेळी माजी आमदार दिलीप माने, उद्योजक कुमार करजगी, यशराज साळुंखे, ज्येष्ठ नेते सुधीर खरटमल, माजी उपमहापौर दिलीप कोल्हे, सामाजिक कार्यकर्ते जॉन फुलारे, इरफान शेख, प्रसाद लोंढे, टकारी समाज युवक संघटना अध्यक्ष विनोद जाधव, माजी नगरसेवक नागेश गायकवाड, आनंद चंदनशिवे, तौफिक शेख, अश्विनी चव्हाण, श्रीदेवी फुलारे, राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या अध्यक्षा सुनीता रोटे, मोनिका सरकार, शशिकला कसपटे, रुक्मिणी जाधव, चेतन गायकवाड, जिल्हा कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष अनिल जाधव उपस्थित होते.

दरम्यान सत्काराला उत्तर देताना किसन जाधव म्हणाले, जनतेच्या आशीर्वादाने आजपर्यंत आपण अविरत काम करत आलो आहोत. या भागातील मतदारांनी तीन टर्म सेवा करण्याची संधी दिली. यापुढील काळात देखील अशीच संधी जनसेवेसाठी द्यावी, असे आवाहन केले. तसेच अजितदादांच्या प्रेरणेने उर्जा मिळते, असे सांगून राज्याच्या मुख्यमंत्रीपदी अजितदादा विराजमान व्हावेत यासाठी किसन जाधव यांनी व्यासपीठावरून चक्क दंडवत घातले.

महिलांच्या गटात एकता स्पोर्टस् क्लबने विजेतेपद तर उपविजेतेपद रुक्मिणी स्पोर्ट्सने पटकाले. यातील विजेत्या संघास सात हजार ६३ रुपये रोख व स्मृतिचिन्ह देण्यात आले. या स्पर्धेचे पंचप्रमुख म्हणून संतोष जाधव यांनी तर परिक्षक म्हणूनसोलापूर जिल्हा कबड्डी असोसिएशनचे कार्यवाहक मदन गायकवाड, मरगू जाधव, एल.एस. जाधव, मोहन जाधव, शिवाजी गायकवाड, अंबादास गायकवाड, प्रकाश जाधव यांनी काम पाहिले.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## ई- निविदा सूचना

ई निविदा महावितरण सोलापूर मंडला कार्यालयाअंतर्गत खराब झालेल्या वितरण पेटी (Distribution Boxes) देखभाल व दूरूस्ती करण्याकरीता नोंदणीकृत व अनुभवी ठेकेदाराकडून ई-निविदा मागवण्यात येत आहे. ई - टेंडर क्र. अअ/सोमंका/टी-०२/२०२३-२४ (निविदा रक्कम रू. ७२.०० लाख, निविदा विक्री दि. २७.०७.२०२३ ते दि. ०९.०८.२०२३ निविदा सादर करण्याची अंतिम तारीख ०९.०८.२०२३ रोजी १४.०० वाजेपर्यंत, इतर सर्व माहिती https://etender.mahadiscom.in/eatApp या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. निम्नस्वाक्षरी धारकाकडे कोणतेही कारण न देता निविदा रद्द करणेबाबत अधिकार राखून ठेवले आहेत.

अधिक्षक अभियंता
सोलापूर मंडल कार्यालय, सोलापूर

PRO/BMTZ/073/2023-24

# ग्रामीण रस्त्यांना पूर्ण बजेट प्रमाणे निधी मिळावा : आ.रणजितसिंह

✔ सुराज्य/अकलूज

**सोलापूर जिल्ह्यातील ९ हजार ३९३ कि.मी. ग्रामीण मार्ग व १ हजार ३८४ इतर जिल्हा मार्ग असे दोन्ही प्रकारचे एकुण १० हजार ७७८ कि.मी. लांबीचे रस्ते जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली आहेत संबंधित रस्त्यांच्या डांबरीकरण व मजबुतीकरणासाठी जिल्हा नियोजन समितीमधून निधी वाटप होत असताना तुकडीकरण पध्दतीने व टप्याटप्प्याने होत आहे.**



तालुका निहाय इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग यांचा प्राधान्यक्रम निश्चित करुन यासाठी लागणारा निधी विचारात घेऊन रस्त्यांच्या तुकडीकरणाला आळा घातला तरच रस्त्यांची कामे दर्जेदार होणार आहेत केवळ निविदेतून पळवाट काढण्यासाठी रस्त्यांच्या कामाचे छोटे-छोटे तुकडे पाडले जातात.निविदा प्रक्रियेचे टप्पे नजरेसमोर ठेवून कामांचे तुकडे पाडण्यास मनाई करण्याची गरज आहे.
– **आ. रणजितसिंह मोहिते पाटील** विधान परिषद सदस्य

१० ते १५ कि.मी. लांबीच्या रस्त्यावर एक ते दीड कि.मी. डांबरीकरण व मजबुतीकरण होत असल्याने जिल्हा परिषदेच्या ताब्यातील रस्त्यांची दिवसेंदिवस दुरवस्था होत आहे.जिल्हा परिषदांच्या ताब्यातील संपूर्ण लांबीच्या रस्त्यांचे डांबरीकरण व मजबुतीकरण करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करावी म्हणून आ.रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी विधानपरिषदेत प्रश्न उपस्थित केला.

आ.मोहिते-पाटील यांच्या प्रश्नावर ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी उत्तर देत सांगितले की सोलापूर जिल्हा परिषदेंतर्गत ग्रामीण मार्ग रस्त्यांची लांबी ९३७७.३७ कि.मी. व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची लांबी १२२५.३३ कि.मी. अशी एकूण १०६०२.७० कि.मी.आहे. सोलापूर जिल्हा परिषदेअंतर्गत ग्रामीण रस्त्यांच्या लांबीचा विचार करता जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत रस्ते दुरुस्तीसाठी मर्यादीत स्वरुपात निधी प्राप्त होतो. ग्रामीण मार्गावरील वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्याच्या अनुषंगाने रस्त्याची कामे केली जातात.परतु त्यात निश्चितच मर्यादा येत आहेत.त्या त्रुटी दुर करुन जिल्हा परिषदेच्या अखत्यारितील रस्त्यांचे नुतनीकरण,मजबुतीकरण, देखभाल दुरुस्ती व्यवस्थित होईल या प्रमाणे सुचना देण्यात येतील असे स्पष्ट केले.

तसेच सोलापूर जिल्हा परिषदेला जिल्हा वार्षिक योजना व रस्ते व पूल दुरुस्ती परिरक्षण कार्यक्रम (३०५४-२४१९) अंतर्गत मागील चार वर्षात साधारणपणे रु.२२९.०० कोटी एवढा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच मुख्यमंत्री ग्राम सडक योजना व प्रधानमंत्री ग्राम सडक योजना या अंतर्गत देखील ग्रामीण रस्ते दुरुस्तीकरिता सोलापूर जिल्ह्यासाठी साधारणपणे रु. ६३३.०० कोटी एवढा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.व यापुढे देखील ग्रामीण रस्त्यांची नवीन कामे आणि देखभाल व दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचे मंत्री गिरीश महाजन यांनी सांगितले.

# जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी फळबाग योजनेत सहभाग व्हावे

## जिल्हा कृषीअधिक्षक दत्तात्रय गवासाने यांचे आवाहन

✔ सुराज्य/सोलापूर

शेतकऱ्यांनी त्यांच्याकडे असलेल्या शेतीतून रोजगार व आर्थिक उत्पन्न मिळवून देण्यासाठी कृषी विभागामार्फत विविध योजना राबविल्या जातात. फळबाग लागवडीला प्रोत्साहन देण्यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सन २०२३-२४ अंतर्गत फळबाग लागवड व फुल पिके लागवड योजना राबविण्यात येत आहे. या योजनेत सहभागी व्हावे असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी दत्तात्रय गावसाने यांनी केले आहे.

योजने अंतर्गत वैयक्तिक बांधावर सलग शेतावर व पडीक जमिनीवर फळ पिके, वनीकरण व फुलझाडे लागवड करता येते. यामध्ये सलग फळबाग लागवडी अंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्याला आंबा, चिकू, डाळिंब, लिंबू, संत्री, सीताफळ, ड्रॅगन फ्रुट, अव्हाकॅडो, केळी द्राक्ष आदी पिकांची लागवड करता येते. पडीक जमिनीवर आंबा, बोर, नारळ, सिताफळ आदी फळपिकांची लागवड करता येते. तसेच गुलाब, मोगरा, निशिगंध आदी फुलझाडांची लागवड करता येते.

या योजनेत लाभार्थींनी क्षेत्र परिस्थितीनुसार लागवडीचे अंतर कमी जास्त करण्यास परवानगी आहे. परंतु देय अनुदान फळपीक लागवडीचे निकष विद्यापीठ शिफारसींनुसार अंतर मर्यादेतच देय राहते. अतिरीक्त कलमे रोपे यांचे अनुदान देय राहणार नाही. लागवड वर्षासह सलग तीन वर्षात मंजूर अंदाजपत्रानुसार अनुदान देय राहते. दुसऱ्या व तिसऱ्या वर्षी बागायती वृक्ष पिकांच्या बाबत जे लाभार्थी कमीत कमी ९० टक्के आणि कोरडवाहू वृक्षपिकांच्या बाबत किमान ७५ टक्के झाडे रोपे जिवंत ठेवतील, अशाच लाभार्थींना दुसऱ्या व तिसऱ्या वर्षाचे अनुदान देय राहणार आहे.

### लाभार्थींचे निकष असे

कमीत कमी ०.०५ हे. व जास्तीत जास्त २.०० हे. प्रति लाभार्थी क्षेत्र मर्यादा राहील. इच्छुक लाभधारकाच्या नावे जमीन असणे आवश्यक आहे. जमीन कुळ कायद्याखाली येत असल्यास व ७/१२ च्या उताऱ्यावर कुळाचे नाव असेल तर योजना राबवत असताना कुळाची संमती आवश्यक आहे.

अल्प व अत्यल्प लाभार्थी, महिला लाभार्थी, दिव्यांग व्यक्ती कुटूंब प्रमुख असलेल्या कुटुंबियांना तसेच अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती, निरधिसूचित जमाती, दारिद्र्य रेषेखालील व्यक्तीस व पंतप्रधान आवास योजनेला प्राधान्य राहील. लाभार्थी शाश्वत उत्पन्नाची साधने उपलब्ध नसावीत. तसेच तो नोकरदार व्यक्ती नसावा. लाभार्थी ऑनलाईन रोजगार कार्डधारक असावा. लाभार्थीस ग्रामसभेची मंजुरी असावी व ग्रामपंचायत लेबर बजेटमध्ये त्याचा समावेश असावा व ग्रामसभेचा ठराव आवश्यक आहे.



## वेळापूर गावामधील म्हेत्रेमळा व जुना पालखी मार्गाची दयनीय अवस्था

✔ **वेळापूर** : वेळापूर गावा मधील अर्धनारी नटेश्वर मंदिर च्या पाठीमागे वेळापूर ते म्हेत्रेमळा ग्रामा नंबर ५४० व जुना पालखी मार्ग ग्रा .मा नं ३६४ हे दोन्ही मुख्य रस्ते आहेत ह्या दोन रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली असून या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले आहे, .रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खाताचे ढीग, रस्त्यावर गुरे बांधणे, रस्त्यावर सरपण लावणे ,वैरणीच्या गंजी लावणे, रस्त्यावर बांधकाम केले आहे .ग्रा.मा. नंबर ३६४ जुना पालखी मार्ग ह्या रस्तावर १९७५ पासून काही लोकांनी पूर्ण अतिक्रमण करून रस्ता पूर्ण पणे बंद केला आहे . त्यामुळे नेहमी जाणे येणे, वाहतुकीस पूर्ण अडथळा निर्माण झाला आहे .त्याचप्रमाणे ग्रा.मा. नंबर ५४० व ३६४ हेरोड वेळापूर ते पिसेवाडी ह्या गावाला जोडणारे आहेत. ह्या रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली असून ह्या रस्त्याने चालत जाणे सुद्धा मुश्किल झाले आहे. ग्रा.मा.नंबर ३६४ जुना पालखी मार्ग ह्या रोडवर महावितरण उपकेद्र वेळापूर यांनी रोडवर विद्युत वाहक पोल उभा करून आतिक्रमण केले आहे.पोल उभा केल्यामुळे शेतीच्या मशागतीसाठी लागणारे वाहणे शेतात घेऊन जात येत नाही. ह्या दोन्ही रोडला साईट पट्या राहील्या नाहीत.शेतकऱ्याला शेतात जाणे मुश्किलीचे झाले आहे.ह्या रोडवरती लोकविकास स्कुल आसुन येथील विद्यार्थांना शाळेत जाणे मुश्किलीचे झाले.तरी हे दोन्ही रोडचे डांबरीकरण त्वरीत करावे आशी मेहत्रेमळा ग्रांमस्ताकडून प्रशासनाला व सरकारला विनंती केली आहे.



## वाफेगाव येथील ग्रामसभेत विविध मागण्यांचे निवेदन

✔ **माळीनगर** : वाफेगाव ता. माळशिरस जि. येथील ग्रामपंचायतची ग्रामसभा दि. २५ जुलै रोजी संपन्न झाली.या ग्रामसभेत केंद्र शासनाकडून रखडलेल्या लोकसंख्या मोजणी, जात निहाय लोकसंख्या सर्वेक्षण करण्याच्या मागणीचा ठराव,तसेच अनुसूचित जाती नवबौद्ध घटक यांच्या विकास आराखड्यासंबंधी अशा विविध मागण्याचे निवेदन वाफेगाव येथील युवक वर्गाच्या उपस्थितीत व सोलापूर जिल्हा युवक काँग्रेस च्या वतीने ग्रामपंचायतचे प्रशासक भोसले यांना देण्यात आले.याप्रसंगी सोलापूर जिल्हा युवक काँग्रेसचे सरचिटणीस- किशोर राजे गाडे पाटील, सरपंच विष्णुपंत गाडे पाटील, ग्रामसेवक क्षीरसागर,तंटामुक्तीचे अध्यक्ष -किसन गायकवाड, युवा कार्यकर्ते- उमेश सरतापे, अजय गाडे, रोहन सोनवणे, सचिन गाडे, सुरज गाडे ,आदी मान्यवर उपस्थित होते.

## मुलींचे वसतीगृह चालू करावे अन्यथा आंदोलन

✔ **मोहोळ** : अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे मोहोळ शहरांमध्ये शासनाने बांधलेले मागासवर्गीय मुलींच्या वसतिगृहाची इमारत बांधून तयार असूनहीभाड्याच्या जागेमध्ये ते सध्या चालू आहे ते नवीन शासकीय इमारतींमध्ये सुरू करावे अशी मागणी युवा जागृती मंचच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाव्दारे करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागामार्फत मोहोळ शहरात साडेसहा कोटी रुपये खर्चून मागासवर्गीय मुलींसाठी नवीन वस्तीगृह बांधण्यात आलेले आहे परंतु ते नवीन वस्तीगृह मागील दोन वर्षापासून धुळ खात पडलेले आहे यापूर्वी भाड्याने घेतलेल्या जागेमध्ये ते भरत होते अजूनही भाड्याची खाजगी इमारत या ठिकाणी वस्तीगृहासाठी वापरली जात आहे. त्यामुळे नाहकपणे शासनाला याचे भाडे भरावे लागत आहे तसेच ते खाजगी भाड्याच्या जागेत असल्यामुळे विद्यार्थिनींना आवश्यक त्या सेवा सुविधा मिळू शकत नाहीत मागील दोन वर्षापूर्वी बांधकाम करून नवीन इमारत पूर्ण झालेली आहे. मुलींचे वस्तीगृह नवीन ठिकाणी सुरू करण्यात यावे अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. या निवेदनावर संस्थापक ड. आकाश कापुरे, उपाध्यक्ष संजय लोंढे, सचिव हरिभाऊ सरवदे, चैतन्य केंगार, महादेव रणदिवे यांच्या सहया आहेत.

# मुली उत्तम शिक्षण घेऊन स्वावलंबी बनतील : आंगळे

## भावसार व्हिजनच्या वतीने गरजू मुलींना शिष्यवृत्तीचे वाटप

✔ सुराज्य/सोलापूर




गरजू मुलींना शिष्यवृत्ती मिळाल्याने त्यांच्या शिक्षणातील म्हत्वाचा अडथळा दूर झाला असून या मुली आता उत्तम शिक्षण घेऊन स्वावलंबी बनतील असा विश्वास भावसार व्हिजनचे गव्हर्नर प्रवीण आंगळे यांनी व्यक्त केला.

भावसार व्हिजन सोलापूर च्या वतीने समाजातील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना दीड लाख रुपयांच्या शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी भावसार व्हिजनचे मल्लिनाथ बासुतकर,नॅशनल डायरेक्टर शिवाजी उपरे , माजी गव्हर्नर श्री गिरीश पुकाले , आशिष जवळकर व प्रणिता महिंद्रकर उपस्थित होते. सोलापूर व्हिजनचे अध्यक्ष मल्लिनाथ बासुतकर यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली. यावेळी गव्हर्नर गिरीश पुकाळे व शिवाजी उपरे यांनी भावसार व्हिजन च्या कार्याची माहिती दिली.या कार्यक्रमात भावसार समाजातील पंचवीस होतकरू व गरजू मुलांना प्रत्येकी सहा हजार रुपयांचे शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास सरिता जवळकर, शाम क्षीरसागर, विशाल खमीतकर, दत्तात्रय फुटाणे, अजय हांचाटे, वंदना पुकाळे, प्रणिता महिंद्रकर, अजय हंचाटे, दीपक महिंद्रकर, ॲड. दिपक मैंदरकर, रमेश माळवे, सुनिल उपरे, श्रिराज निकाते , रेखा हीबारे, नागनाथ हिबारें विद्यानिकेतन प्रशाले चे मुख्याध्यापक भगवान माने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष पुकाळे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रणिता महिंद्रकर यांनी केले.

## नेत्ररोग तज्ञ परीक्षेत डॉ. तांबोळीचे यश

✔ सुराज्य/अक्कलकोट



अक्कलकोट नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष कै.मं.शफी टिनवाला यांची नात डॉ.निखत इक्बाल तांबोळी हिने एमबीबीएस व एमएस ऑप्थोमोलॉजी (नेत्ररोग तज्ञ) परिक्षेत यश मिळविल्याबद्दल अक्कलकोटसह सोलापूर जिल्ह्यातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## मृत्यूस कारणीभूत; कंटेनर चालकाविरुद्ध गुन्हा


✔ सुराज्य/सोलापूर

मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी कंटेनर चालकाविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कंटेनर क्र.एनएल.१ एबी.४०५६ याचा चालक याने त्याच्या ताब्यातील वाहन निष्काळजीपणे व भरधाव वेगात चालवून फिर्यादी अतिक अहमद मोहम्मद हयात विजापूरे (वय-४८,रा.सिद्धेश्वर पेठ) यांचा भाऊ फैजअहमद विजापुरे (वय-५३) हे चालवत असलेल्या मोटारसायकलीला धडक देऊन गंभीर जखमी करून त्यांच्या मृत्यूस कारणीभूत झाला आहे. व तसेच दुचाकीचे नुकसान केले आहे.ही घटना २६ जुलै रोजी रात्री सव्वा अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ समोरील रस्त्यावर घडली.अशा आशयाची फिर्याद अतिक विजापुरे यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात दिली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून कंटेनर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोसई भोईटे हे करीत आहेत.

# शिक्षकांच्या लक्षवेधी मुंडण धरणे आंदोलनाची मुख्यमंत्र्यांनी घेतली दखल

## २१ जूनचा शासन निर्णय रद्द होण्याची शक्यता

✔ सुराज्य/सोलापूर



जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या ऑनलाईन जिल्हांतर्गत व आंतरजिल्हा बदल्या बंदचा २१ जून २०२३ चा शासन निर्णय रद्द करून जिल्हा परिषद शिक्षकांच्या जिल्हा अंतर्गत व आंतर जिल्हा बदल्या पुर्वीप्रमाणे ऑनलाइन कराव्यात या मागणीसाठी शिक्षक सहकारी संघटनेचे राज्य अध्यक्ष संतोष पिट्टलवाड यांच्या नेतृत्वात सोमवारी शिक्षकांनी मुंबईतील आझाद मैदानात लक्षवेधी मुंडण धरणे आंदोलनाची शासनाने दखल घेतली.

२१ जून २०२३ चा अन्यायकारक शासन निर्णय रद्द करण्यासंदर्भात व शिक्षक व विद्यार्थी हिताच्या मागण्या संदर्भात लक्षवेधी आंदोलन शिक्षक सहकार संघटने कडून मुंबईतील आझाद मैदानावर करण्यात आले.त्याची दखल घेऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या तर्फे शिक्षक सहकार संघटनेचे राज्याध्यक्ष संतोष पिट्टलवाड व राज्य सरचिटणीस निलेश देशमुख यांच्या शिष्टमंडळाला बोलावून सार्वजनिक आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी चर्चा केली. यावेळी शिष्टमंडळाने सदर शासन निर्णयातील नकारत्मक बाबी समजावून सांगितल्या तसेच १० हजार शिक्षकांच्या स्वाक्षरी चे निवेदन दिले. सार्वजनिक आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी सदर शासन निर्णय पूर्णतः नियमबाह्य आहे व शिक्षकांवर अन्याय करणारा आहे म्हणून हा शासन निर्णय लवकरात लवकर रद्द करण्यासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा करून हा शासन निर्णय रद्द करू असे शिष्टमंडळ यांना सांगितले.

शिष्टमंडळामध्ये शिक्षक सहकार संघटनेचे राज्याध्यक्ष व राज्य सरचिटणीस निलेश देशमुख हे होते.

# पंतप्रधान किसान समृद्धी केंद्र शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणार : चव्हाण

✔ सुराज्य/मोहोळ

शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणारे बी बियाणे औषधे अवजारे खते या वस्तूंच्या खरेदीसाठी यापुढे वेगवेगळ्या दुकानात जावे लागणार नाही .पंतप्रधान किसान सुविधा केंद्र ही योजना या सर्व सेवा सुविधा एकाच ठिकाणावरून करण्यासाठी सुरू करण्यात येत असून शेतकऱ्याची नाहक धावपळ वाचणार असल्याची माहिती मोहोळ तालुका भाजपाचे अध्यक्ष आणि भीमा कारखान्याचे संचालक सुनील चव्हाण यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली.

या किसान समृद्धी केंद्रामध्ये शेतकऱ्याला दर्जेदार बी बियाणे औषध खत कीटकनाशक आधी एका ठिकाणीच उपलब्ध होणार आहे त्याचबरोबर माती परीक्षण, बियाणे आणि खताची चाचणी आदि सुविधा सुध्दा तिथे उपलब्ध होणार आहेत. याशिवाय शेतकऱ्यांना लागणाऱ्या अन्य सेवा विक्री पध्दतीने किंवा कस्टम हायरिंग सेंटर द्वारे करून देणार आहे.

त्याचबरोबर केंद्र व राज्य सरकारच्या शेतकरी कल्याणाच्या योजनांची माहिती वेळोवेळी या केंद्रातून शेतकऱ्यांना दिले जाणार आहे संपूर्ण देशात जिल्हा तालुका व खेडेगाव पातळीवर खतांचे किरकोळ विक्री करणारी २ लाख ८ हजार दुकाने आहेत या दुकानांचे टप्प्याटप्प्याने प्रधानमंत्री किसान सुविधा केंद्र मध्ये रूपांतर करण्यात येईल.

पत्रकार परिषदेला महेश सोवनी, अविनाश पांढरे, सतीश पाटील, विष्णुपंत चव्हाण, जगन्नाथ वसेकर, गणेश झाडे, अविनाश पांढरे उपस्थित होते.

## जुगार खेळणाऱ्या अड्ड्यावर पोलीसांचा छापा

✔ **लक्ष्मी दहिवडी** : मंगळवेढा तालुक्यातील खडकी येथे शेतातील एका पत्राशेडच्या आडोशाला ५२ पत्त्याच्या पानावर पैशाची पैज लावून मन्ना नावाचा जुगार खेळणाऱ्या अड्ड्यावर पोलीसांनी छापा टाकून २ लाख ४ हजार ५७० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करुन किसन राठोड (वय ५२), श्रीमंत कांबळे (वय ६०), रामलिंग जाधव (वय३७),शंकर मरीआईवाले (सर्व रा.खडकी), विश्वास कांबळे (५७) (नंदेश्वर) या पाचजणाविरुध्द महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मन्ना नावाचा जुगार खेळत असल्याची माहिती प्रशिक्षणार्थी पोलीस अधिकारी नयोमी साटम यांना मिळताच त्यांनी पोलीसांच्या मदतीने दि.२६ रोजी दुपारी १.४० छापा टाकला. याची फिर्याद पोलीस शिपाई अजयसिंह शिंदे यांनी दिल्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

# दूध संघांनी रिटर्न दरही वाढविले

## दर निश्चिती नंतरही फायद्या ऐवजी तोटाच; शेतकऱ्यांसह संघटनांचा आक्षेप

✔ सुराज्य/सोलापूर

रिटर्न दर किती असावा याबाबत नवा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे रिटर्न दराबाबत नवे धोरण असावे, तसेच फॅट मशिनची तपासणी करावी व कमी फॅट दाखविणाऱ्यावर कारवाई करावी याबाबतही सरकारकडे मागणी करणार आहोत.दर वाढवताच दूध कंपन्यांनी शेतकऱ्यांची लूट सुरू ठेवण्याची नवी क्लृप्ती अमलात आणली आहे. ३.५/८.५ पेक्षा कमी फॅट/एस.एन.एफ'च्या दुधाचे दर पाडण्याचे षड्यंत्र रचले आहे. संकरित गायींची शारीरिक रचना, हवामान व चाऱ्याची गुणवत्ता यामुळे ७० टक्के गायींच्या दुधाला ३.५/८.५ पेक्षा कमी फॅट/एस.एन.एफ. मिळते. कंपन्यांच्या या नव्या डावपेचांमुळे शेतकरी अडचणी येणार आहे.त्यामुळे दुध संघांचा हा डाव उधळून लावण्यासाठी प्रयत्नशील आहे.
– **सदाभाऊ खोत, माजी मंत्री**

पावसाळ्यात दुधाला ३.२ किंवा ३.३ फॅट आणि ८.२ किंवा ८.३ एसएनएफ मिळतो. त्यामुळे साडेतीन, चार रुपये कमी होतील. साधारणत: ३० रुपये दर शेतकऱ्यांना मिळणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना फायदा होण्याऐवजी नुकसानच होईल, दुध संघांनी षडयंत्र रचले असून एका पॉइंटला एक रुपया कमी करण्याचा निर्णय घेतल्याने शेतकऱ्यांना कुठलाही लाभ होणार नाही. त्यामुळे दुधाच्या दराबाबत शासनाने ठोस भूमिका घेतली पाहिजे.व दुधाचे रिटर्न दर हे जुनेच ठेवायला हवे होते.तसेच सरकारने प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी फॅट व एसएनएफ तपासणी साठी सरकारी प्रयोगशाळा उभारणे गरजेचे आहे. त्यामुळे खरे फॅट,एसएनएफ शेतकऱ्यांना समजले जाईल.
– **बालाजी चव्हाण** दुध उत्पादक शेतकरी

राज्य सरकारकडून गाईच्या दुधाला नुकताच ३४ रुपये प्रति लिटर दर बंधनकारक करण्यात आला आहे. २१ जुलैपासून या निर्णयाची अंमलबजावणी सुरू झालेली असतानाच या दूध दरापेक्षा कमी फॅट व एसएनएफ'असलेल्या प्रत्येक पॉइंटला होणाऱ्या रिटर्न दरा'तही वाढ काही खासगी संस्थांनी केल्याने दूध उत्पादक शेतकऱ्यांत नाराजी निर्माण झाली आहे. सरकारने याप्रश्नी हस्तक्षेप करण्याची मागणी दुध उत्पादक शेतकऱ्यांनी केली आहे.

पूर्वी एसएनएफ' कमी लागला, तर प्रति पॉइंट ३० पैसे व फॅट कमी असेल तर प्रति पॉइंट २० ते पंचवीस पैसे दर कमी केला जायचा. आता एसएनएफ' प्रत्येक पॉइंटला एक रुपया, तर फॅट'च्या प्रत्येक पॉइंटला पन्नास पैसे प्रति लिटरमागे कमी होणार आहे. परिणामी, त्याचा आर्थिक फटका दूध उत्पादक शेतकऱ्यांनाच सोसावा लागणार आहे.दर दोन रुपयांनी वाढवले असले, तरी रिटर्न दर'ही वाढविले असल्याने शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला आहे.दुध संघांनी मनमानी पद्धतीने दर कमी केल्याने दर निश्चितीसाठी शासनाने नियुक्त केलेल्या समितीच्या शिफारशीनुसार गाईच्या दुधाला ३४ रुपये दर देण्याच्या निर्णयानंतर डेअऱ्यांनी त्यानुसार खरेदीस सुरुवात केली आहे.

# कुर्डूवाडीत बांधकाम कामगारांची विक्रमी नोंदणी

## आ. संजयमामा शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त १४५५ कामगारांचा सहभाग

✔ सुराज्य/सोलापूर

**बांधकाम कामगार कल्याणकारी संस्था माढा तालुक्याच्या वतीने आ. संजयमामा शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त सोलापूर जिल्ह्यात प्रथमच भव्य कामगार नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदरच्या शिबिरामध्ये १४५५ कामगारांनी सहभाग घेत आपली नोंदणी केली. एकाच वेळी ही इतिहासातली सर्वात मोठी बांधकाम कामगारांची नोंदणी झाली आहे.**

शिबिराचे उद्घाटन संत कुर्मदास साखर कारखान्याचे संचालक दादासाहेब साठे, उद्योजक निलेश धोका, भोसरे जिल्हा परिषद माजी सदस्य आप्पासाहेब उबाळे, हमाल पंचायतीचे अध्यक्ष सुरेश बागल, हिंदवी परिवाराचे प्रमुख संतोष कापरे, संकेत उद्योग समूहाचे सतीश कन्हेरे, शिवव्याख्याते हर्षल बागल, इंजि. अजित पवार, शरदचंद्र भोसले, बाळासाहेब बागल, महादेव फासे, धनंजय परबत, नामदेव बोराटे, नीलकंठ भुसनर, अक्षय खाडे, जीवन चव्हाण, अमरसिंह मोरे, बालाजी शिंदे यांच्या उपस्थितीत झाले. बांधकाम कामगारांचे नोंदणी शिबिर हे इतिहासातील सर्वात मोठे शिबिर ठरले. बांधकाम कामगारांच्या



परिवाराला फायदेशीर असणारे लाभ, विविध सरकारी योजना याबाबतीत उद्घाटन समारंभामध्ये आपल्या प्रास्ताविकामध्ये संतोष कापरे यांनी माहिती दिली. तर पंडित खारे, शरदचंद्र भोसले, धनंजय परबत यांनी मनोगत व्यक्त केले. सदरच्या कामगार नोंदणी शिबिरामध्ये संकेत मंगल कार्यालय हाउसफुल झाल्याचे दिसून आले. सुत्रसंचलन संतोष परबत यांनी केले तर आभार कल्याणकारी कामगार संस्थेचे अध्यक्ष संभाजी बागल यांनी मांडले. शिबिर चालू असतानाच दुसऱ्या बाजूला कल्याणकारी संस्थेच्या वतीने संजयमामा शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिराचे देखील आयोजन केले होते. या शिबिरामध्ये एकूण ५३ रक्तदात्यांनी रक्तदान देऊन सहभाग नोंदवला.

संजयमामा शिंदे वाढदिवसानिमित्त आयोजित बांधकाम कामगार नोंदणी शिबिर यशस्वी करण्यासाठी बांधकाम कामगार कल्याणकारी संस्थेचे अध्यक्ष संभाजी बागल, उपाध्यक्ष नानासाहेब जगताप, सचिव दत्तात्रय जगताप, खजिनदार धनंजय माने, रोहिदास बागल, बालाजी चव्हाण, नाना बागल, उमेश गोसावी, संजय बागल, पांडू बागल, पप्पू गोरे, बंडू बागल, सचिन बागल, आकाश घाडगे, धनु डांगे, ज्ञानेश्वर शिंदे, अंकुश रणदिवे, महेश माने, तात्या चौरे यांनी परिश्रम घेतले.

### धोका परिवाराच्या वतीने विद्यार्थ्यांना दहावी बारावीला पाच हजारांची शिष्यवृत्ती

बांधकाम कामगार कल्याणकारी संस्थेकडे ज्या ज्या कामगारांनी नोंदणी केली अशा कामगारांच्या पाल्यांनी तालुक्यात दहावी आणि बारावीला जे सर्वोत्तम गुण मिळवतील अशा पाल्यांसाठी कुर्डूवाडीतील उद्योजक निलेश धोका यांच्या परिवाराच्या वतीने दहावी व बारावीला पाच हजार रुपये शिष्यवृत्ती पुढील वर्षीपासून देण्यात येईल, अशी घोषणा या शिबिरामध्ये शिवव्याख्याते हर्षल बागल यांनी केली.

कामगारांना सरकारी योजनांचे लाभ मिळवून देणे, सरकारच्या विविध योजनांसाठी कामगारांना साक्षर बनवणे, त्यांच्या नोंदणी करून घेणे हे आजपर्यंत कधीही कोणत्याही ठेकेदाराने, कोणत्याही संघटनेने केले नाही. परंतु बांधकाम कामगारांच्या इतिहासात सर्वात मोठी ही नोंदणी असून हे पुण्याचे काम बांधकाम कामगार कल्याणकारी संस्था करत आहे. **– दादासाहेब साठे**

संचालक – संत कुर्मदास साखर कारखाना



## शिवरत्नच्या 'बीबीए' मध्ये कलाम यांना अभिवादन

✔ **अकलूज** : येथील शिवरत्न शिक्षण संस्था संचलित शिवरत्न इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज महाविद्यालयात माजी राष्ट्रपती व वैज्ञानिक तसेच भारताचे 'मिसाईल मॅन' म्हणून ओळख असलेल्या डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले. शिवरत्न शिक्षण संस्थेच्या लेखाविभागाचे मुख्यलेखापाल निवृत्ती भोसले यांच्या हस्ते स्व. कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करून आदरांजली वाहण्यात आली. या वेळी प्राचार्य डॉ. अरविंद कुंभार यांनी कलाम यांचे योगदानवर माहिती दिली. संरक्षण संशोधन आणि विकास संस्था आणि भारतीय अंतराळ संशोधन संस्था यातील सहभाग व पोखरण अणुचाचण्यामध्ये त्यांनी केलेली संघटनात्मक भूमिकेबद्दल यावेळी प्रामुख्याने प्रकाश टाकण्यात आले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी व बीबीए अभ्यासक्रमाचे विद्यार्थी व विद्यार्थीनी बहुसंख्येने उपस्थित होते.



## वाचन सप्ताह निमित्ताने विविध स्पर्धा

✔ **उ. सोलापूर** : केरळ राज्य ग्रंथालय, साक्षरता चळवळींचे जनक पी. एन. पणिकर यांच्या स्मृती दिन व वाचनदिनानिमित्त रुक्मिणी देवी सार्वजनिक वाचनालय, मार्डी येथे निमित्त निबंध स्पर्धा व चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या. चित्रकला स्पर्धेमध्ये प्रथम प्रणिती ज्ञानेश्वर गंजे ५वी, द्वितीय अपूर्वा गोरोबा कांबळे. (इ.७वी), तृतीय सई सतीश गंजे (इ.७वी), निबंध स्पर्धा प्रथम- आर्या अमोल पवार (इ.७वी),द्वितीय- पुतीमा इरफान शेख. (इ.५वी),तृतीय - सोहम मंगेश सप्ताळ (इ.६वी) यांनी यश मिळवले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना जिल्हा परिषद शाळा मार्डी चे मुख्याध्यापक मल्लिनाथ राठोड, माधुरी भोसले, अर्चना देशमख, सुनील हिबारे, सचिन नवले, ग्रंथपाल प्रतिक्षा पवार, लिपिक वृषाली पवार यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.



## कोंडीत किसान समृद्धी योजना शिबीर

✔ **उ. सोलापूर** : उत्तर तालुक्यातील कोंडी येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी प्रधानमंत्री किसान समृध्दी केंद्र योजनेचे राजस्थान मधून उद्घाटन करण्यात आले. प्रधानमंत्री किसान समृद्धी केंद्र देशभरात दोन लाख आठ हजार ठिकाणी सुरू होणार आहे. देशभरातील शेतकऱ्यांच्या उज्वल व भविष्यासाठी या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे, खते, औषधे, कीटकनाशके व अवजारे एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे. या योजनेबाबत स्थानिक शेतकऱ्यांना माहिती मिळावे म्हणून मार्गदर्शन शिबीर घेण्यात आला.यावेळी कृषी विभागाचे लक्ष्मण भुई, भारतीय जनता पार्टी जिल्हा उपाध्यक्ष गणेश भोसले, शिवसेना जिल्हा उपाध्यक्ष शिवाजी नीळ, राहुल निंबाळकर, महेश मोरे, किशोर नीळ यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

## प्रा. डॉ. संजय रणदिवे यांचे सेट परीक्षेत यश



✔ **मोहोळ** : अंकोली गावचे सुपुत्र आणि सद्या गोव्यात कार्यरत असलेले प्रा. डॉ. संजय बाळासाहेब रणदिवे यांनी राज्यस्तरीय पात्रता(सेट) परीक्षेत उत्तीर्ण होऊन यश संपादन केले आहे. पी. ई.एस. शिक्षणशास्त्र महाविद्यालय, फर्मागुडी, फोंडा, गोवा येथे कार्यरत असणारे प्रा. डॉ. संजय रणदिवे यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आयोजित युजीसी मार्च २०२३ मध्ये आयोजित केलेल्या राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (सेट) इंग्रजी या परीक्षेत उज्ज्वल यश संपादन केले आहे. यापूर्वी ही ते राज्यस्तरीय पात्रता परीक्षा, राष्ट्रीय पात्रता परीक्षा शिक्षणशास्त्र या विषयातून उत्तीर्ण झाले आहेत.तसेच त्यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर येथून पीएच.डी.ची पदवी संपादन केली आहे. प्रा. संजय रणदिवे हे गेल्या तेरा वर्षांपासून अध्यापनाचे कार्य करीत आहेत. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे मार्गदर्शक, चेअरमन, माजी मुख्यमंत्री आ. रवी नाईक, संस्था सचिव रितेश नाईक, प्रा. गुरुप्रसाद खानोलकर यांनी कौतुक आणि अभिनंदन केले आहे.

## मोहिनी देवकर विधीज्ञ परीक्षेत उत्तीर्ण



✔ **पिलीव** : माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील कु. मोहिनी रघुनाथ देवकर हिने सावित्रीबाई फुले विद्यापीठाअंतर्गत झालेल्या एल एल बी या परीक्षेमध्ये विशेष प्राविण्यातून यश संपादन करून विधीज्ञ (वकील) ही पदवी मिळवली. तिच्या या यशाबद्दल महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपालीताई चाकणकर यांनी पेढा भरूवून तिचे अभिनंदन केले. तिच्या या यशाबद्दल सोलापूर जिल्हा परिषद कृषी समिती माजी सभापती संग्राम सिंह जहागीरदार,सद्गुरू कारखान्याचे चेअरमन एन शेषागिरी राव,व्हॉ. चेअरमन डॉ. बाळासाहेब कर्णवर, संचालक उषाताई मारकड, उदय जाधव, पिलीव गावचे सरपंच नितीन मोहिते,गणेश पाटील,यांनी अभिनंदन केले.

सुराज्य सोलापूर Classified

विवाह विषयक

वधू-२९, ५.३, गोरी, १२ वी, हिंदु माळी नाममात्र घटस्फोटीत. वडील नाही, आई मुलींची पिठाची व मसाल्याची गिरणी, शेती ५ एकर, मुलीकरीता सर्वजातीय वर चालेल. त्वरीत लग्न.
मो. नं. ८३७८८७९२६४, ७०२८५३६९९९ (300723)

# विरवडेतील सराईत गुन्हेगार सद्दम शेख स्थानबद्द

✔ सुराज्य/विरवडे बु

सोलापूर ग्रामीण, कामती पोलीस ठाणे हद्दीतील विरवडे बुद्रुक गावामधला सराईत गुन्हेगार सद्दाम रशिद शेख यास M.P.D.कायदया अंतर्गत स्थानबध्द करण्यात आले.



मागील सहा वर्षापासून दहशत राहावी व त्यातून त्यास आर्थिक तसेच इतर फायदे मिळावे याकरीता गुन्हेगारी वर्तन करत होता. त्याच्या विरुध्द सोलापूर, पुणे, कोल्हापूर जिल्हयात खुनाचा प्रयत्न करणे, खुन करण्याच्या उद्देशाने अपहरण करणे, सरकारी कामात अडथळा निर्माण करणे, अल्पवयीन मुलीस फुस लावून बलात्कार करणे, मालमत्ता जबरीने घेण्याच्या उद्देशाने दुखापत पोहोचवणे, शिवीगाळी दमदाटी करून जिवे ठार मारण्याची धमकी देणे, तसेच विनापरवाना वाळु चोरू करून वाहतुक करणे, अशा प्रकारचे गुन्हे दाखल आहेत.

गुन्हेगार सद्दाम रशिद शेख, याच्या गुन्हेगारी कारवायांवर वेळीच प्रतिबंध राहण्याकरीता तत्कालीन सहा. पोलीस निरीक्षक, अंकुश माने, कामती पोलीस ठाणे यांनी च. झ. ऊ . अधिनियम अन्वये मा. पोलीस अधिक्षक, सोलापूर ग्रामीण यांच्या मार्फतीने प्रस्ताव सादर केला होता. मिलींद शंभरकर, तात्कालीन जिल्हादंडाधीकारी, सोलापूर यांनी स्थानबध्दतेचे आदेश निर्गमित केल्याने त्यास दिनांक २३ रोजी येरवडा कारागृह, पुणे येथे जमा करण्यात आले आहे.

सदरचे आदेश तात्कालीन जिल्हादंडाधिकारी मिलींद शंभरकर, यांनी पारीत केले आहे. पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अपर पोलीस अधीक्षक, हिंमत जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी, सोलापूर ग्रामीण विभाग, अमोल भारती, पोलीस निरीक्षक, सुरेश निंबाळकर, ने. स्थानिक गुन्हे शाखा, तत्कालीन पोलीस निरीक्षक सुहास जगताप, स्थानिक गुन्हे शाखा यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि / अंकुश माने, सपोनि / राजकुमार डुणगे, पोउपनि / सुखदेव गोदे, स. पो.फौ. निलकंठ जाधवर, पो.ना. अनिस शेख, पो. ना. भरत चौधरी, पो.ना. अमोल नायकोडे, यांनी सदरची कामगीरी पार पाडली आहे.

# पिलीव येथील महालक्ष्मी देवीच्या जागेसाठी अधिवेशनात लक्षवेधी

✔ सुराज्य/पिलीव

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या महालक्ष्मी देवी आहे.मात्र याठिकाणी कसल्याही प्रकारच्या सुविधा उपलब्ध नाहीत .यासाठी आ राम सातपुते यांच्या विशेष प्रयत्नाने दोन कोटी रुपये विकास निधी उपलब्ध करुन दिला आहे. मात्र याठिकाणी भक्त निवास,सुलभ शौचालय ,रस्ते व इतर सुविधा उपलब्ध करुन देणयासाठी जागाच उपलब्ध नाही. यासाठी अधिवेशनात लक्षवेधी मांडली.



याठिकाणी फेब्रुवारी - मार्च महीन्यात जवळपास पंधरा दिवस मोठी यात्रा भरते या यात्रेला कर्नाटक, आंध्र प्रदेश व इतर जिल्हातुन लाखो भाविक व व्यापारी येतात परंतु याठिकाणी एवढया वर्ष यात्रा भरुनही कसल्याही प्रकारच्या मुलभुत सुविधा उपलब्ध नाहीत. याठिकाणी २०० एकराच्या आसपास इनामी जमीन आहे पण तरीही जागा देत नसल्यामुळे सोयीसुविधा उपलब्ध करुन देणे शक्य नाही. अशी लक्षवेधी आज अधिवेशनात मांडली.यावर सोलापूर जिल्हाचे पालकमंत्री तथा महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी याविषयी सोलापूर जिल्हा अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समन्वय समिती गठीत करुन ताबडतोब हा प्रश्न मार्गी लावुन सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या सुचना देणार असल्याचे आश्वासन त्यांनी दिले.



# छावणी चालकांचे जनावरांसह धरणे आंदोलन

✔ सुराज्य/सांगोला

अनेकवेळा मागणी करून सुध्दा सन २०१८-१९ च्या चारा छावणींची बिले मिळाली नसल्यामुळे पासून सांगोला तहसील कार्यालयासमोर सांगोला व मंगळवेढा तालुक्यातील छावणी चालक जनावरांसह धरणे आंदोलनास बसले आहेत.

छावणींचे प्रलंबीत अनुदान जो पर्यंत मिळत नाही तो पर्यंत हे आंदोलन सुरुच राहणार असल्याचे छावणी चालकांमधून सांगण्यात आले. सांगोला व मंगळवेढा २०१८-१९ तालुक्यातील चारा छावणी चालक यांनी सन च्या दुष्काळात पशुधन जगविण्यासाठी पुढे येवूनचारा छावण्या शासनाच्या नियमानुसार योग्य व चांगल्या प्रकारे चालविल्या होत्या. प्रत्येक छावणीवर एक अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक छावणीवर राहुन देखरेख करत होते.

त्याचप्रमाणे चारा, पाणी तपासणे, जनावरे मोजणे व त्यांच्या सहीने तहसील कार्यालयाला जनावरांच्या संख्येचा अहवाल दिला जात होता. आठवडयातून एक वेळा छावणी समितीच्या सर्व सदस्यांच्या सहीने तहसील कार्यालयास जनावरांच्या संख्येचा अहवाल दिला जात होता. तसेच पुरवठा विभागाची तालुक्याची टिम, जिल्ह्याची टिम आठवडयातून एकदा रात्री दिवसा कधींही भेट देवुन चारा छावणीची तपासणी करीत असत वेळोवेळी अधिकार्यामार्फत दप्तर तपासणी, चारा पाणी तपासणी होवून भेट रजिस्टर मध्ये अधिकाऱ्यांनी नोंदी केलेल्या आहेत.

छावणी चांगल्या प्रकारे चालविल्याचे अहवाल दिलेले आहेत. छावणी चालकाने योग्य व चांगल्या प्रकारे चारा छावण्या चालविल्या असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. बिड, माण, खटाव व महाराष्ट्रातील इतर जिल्हयातीलछावणींची बिले देण्यात आली. परंतु कांही अधिकार्यांच्या व पुढार्यांच्या आर्थीक लालसेपोटी सोलापूर जिल्हयातील चारा छावणींची बिले रखडण्यात आली आहेत. वेळो वेळी जिल्हाधिकारी, तहसिलदार,उपविभागीय अधिकारी मंगळवेढा, महाराष्ट्र राज्य सचिव, मुख्यमंत्री, आरोग्य मंत्री यांना भेटुन व लेखी निवेदनाव्दारे चारा छावणींच्या बिलांची मागणी केली. परंतु या बाबत कोणत्याही प्रकारची दखलघेतली गेली नाही. त्यामुळे छावणी चालकांना सावकार, बँकेचे पैसे देता येत नसल्यामुळे छावणी चालकावर आत्महत्या करण्याची वेळ आलेली आहे.

या आंदोलन स्थळी पुरोगामी युवक संघटनेचे प्रदेशाध्यक्षडॉ. बाबासाहेब देशमुख, शिवसेनेचे दादा लवटे, विजयकुमार इंगवले, दादाशेठ बाबर यांनी भेट दिली. तहसीलदार संजय खडतरे यांनी भेट देवून छावणी चालकांचे निवेदन स्विकारले.

## ५० हजारांची खंडणी; आरोपीला अटक

✔ सुराज्य/सोलापूर

आमच्या एरियात काम करायचे असेल तर ५० हजाराची खंडणी दे, अन्यथा काम करू देणार नाही असे म्हणत केबल जाळून नुकसान केल्याची घटना तोंडले (ता.माळशिरस) येथे बुधवारी घडली . या प्रकरणात वेळापूरच्या पोलिसांनी अजित विलास कोडक (वय ३७ रा.तोंडले ता. माळशिरस) याला अटक करून खंडणी आणि मारहाणीचा गुन्हा दाखल केला आहे.

तोंडले येथील वेळापूर ते पंढरपूर रोडवर एअरटेल कंपनीचे केबल टाकण्याचे काम चालू आहे. हॉटेल शिवनेरी जवळ काम चालू असताना अजित कोडक हा काल दुपारी येऊन कामगारांना धमकी देऊन काम बंद पाडले. आणि केबलला आग लावली .तसेच या ठिकाणी काम करायचे असेल तर ५० हजार रुपये द्या नाहीतर काम करणाऱ्यांना दगडांना मारण्याची धमकी दिली. केबल जाळल्याने या परिसरातील परिसरातील नेटवर्क ५ ते ६ तास बंद पडले होते. दरम्यान कंपनीचे अभियंता रमेश मुंशीलाल श्रीवास्तव यांनी वेळापूर पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली. पुढील तपास फौजदार काझी करीत आहेत.



# जवान सुरेश देशमुख यांना श्रद्धांजली

## कारगिल विजय दिवस साजरा

✔ सुराज्य/सांगोला

सोलापूर जिल्ह्यातीलआजी माजी सैनिकासाठी विजय दिवसाचे आयोजन सांगोला तालुक्यांतील सोनद येथे करण्यात आले होते. कारगिलच्या लढाई मध्ये सोलापूर जिल्ह्यातून शहीद झालेले जवान सुरेश आप्पासाहेब देशमुख यांच्या स्मारकास श्रद्धांजली वाहण्यात आली.

पुरोगामी युवक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी आपले विचार सांगताना आपण आपण जेवण करताना शेतकऱ्याची आणि झोपतेवेळी जवानाची आठवण करावी की ज्यांच्यामुळे आपणाला पोटभर जेवण आणि शांत झोप मिळते असे आपले विचार मांडले. कॉंग्रेसचे अभिषेक कांबळे तसेच युवा नेते जगदीश बाबर यांनीही आपले विचार सांगितले .

या श्रद्धांजली कार्यक्रमासाठी सोलापूर हून माजी सैनिक सहाय्यक कल्याण अधिकारी अर्जुन कोडग, सांगोला माजी सैनिक कल्याणकारी संघटनेचे अध्यक्ष रावसहेब साळुंखे, माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष रामचंद्र काशीद, सचिव मुरलीधर ठोकले, डॉ. बाबासाहेब देशमुख, युवा नेते सागर पाटील, शहीद पिता आप्पासाहेब देशमुख, जगदीश बाबर, सब इंस्पेक्टर काशीद, जिल्हा परिषद सदस्य सतीश काशीद, उपस्थित होते.

# पाच हजारापर्यंतचेच वीजबिल रोखीने भरता येणार

## पाच हजारांवरील बिलासाठी ऑनलाईन पर्याय

✔ सुराज्य/सोलापूर

महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने दिलेल्या आदेशान्वये लघुदाब कृषी वर्गवारीतील ग्राहक वगळता इतर सर्व वर्गवारीतील वीज ग्राहकांना वीज बिल रोखींने भरण्याची कमाल मर्यादा पाच हजार तर लघुदाब कृषी वर्गवारीतील ग्राहकांना ही मर्यादा दहा हजार रुपये करण्यात आली आहे.

त्यावरील रकमेच्या वीज बिलांचा रोखींने भरणा करण्यास निर्बंध लागू करण्यात आले आहे. हे निर्बंध १ ऑगस्टपासून लागू करण्यात येणार असून त्यानंतर कुठल्याही वीज ग्राहकाने या मर्यादेपलीकडील वीजबिलांचा भरणा केवळ ऑनलाईन' पद्धतीनेच करण्याचे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

विनामर्यादा वीज देयकाचा भरणा करण्यासाठी ग्राहक ऑनलाईन' पध्दतीने महावितरणच्या्ु.ारहरवळीलो.ळप या संकेतस्थळावरून तसेच प्रत्येक



महावितरणच्या मोबाईल ॲपद्वारे केव्हाही व कुठूनही करु शकतो. ही पध्दत अत्यंत सुरक्षित असून, ऑनलाईन' वीजबिल भरल्यास दरमहा ५०० रुपयांच्या मर्यादेत महिन्याच्या वीजबिलामध्ये ०.२५ टक्के (जास्तीत जास्त ५०० रुपये) तर वीजबिलाचे प्रॉम्प्ट पेमेंट केल्यास १ टक्का असे एकूण १.२५ टक्के सुट वीजग्राहकांना देण्यात येते. विशेष म्हणजे क्रेडिट कार्ड वगळता उर्वरीत सर्व पर्यायांद्वारे ऑनलाईन पद्धतीने होणारा वीजबिलाचा भरणा निः शुल्क आहे. या प्रणालीची कार्यपध्दती महावितरणच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.लघुदाब ग्राहकांसाठी घरबसल्या एका क्लिकवर वीजबिल भरण्याची सुरक्षित व सोयीची ऑनलाइन सेवा उपलब्ध आहे. ऑनलाइनव्दारे वीजबिलांचा भरणा करणे अत्यंत सुरक्षित असून या पद्धतीस भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पेमेंट व सेटलमेंट कायदा २००७ च्या तरतुदी असल्याने पाच हजारापेक्षा अधिक रकमेचे वीजबिल रोखींने स्विकारण्यात येऊ नये अशा आशयाच्या सुचना सर्व वीज भरणा केंद्र, जिल्हा सहकारी बँकांना, सहकारी संस्था व पतपेढ़ी यांना महावितरणकडून देण्यात येत असून ग्राहकांनी देखील आपले वीजबिल ऑनलाईन' पद्धतीने भरण्यास प्राधान्य देण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

## ▶▶ महत्त्वाचे वृत्त...

### बनावट संकेतस्थळाद्वारे ग्राहकांची फसवूणक

✔ **मुंबई :** हॉटेलचे छायाचित्र व लोगोचा वापर करून तयार केलेल्या बनावट संकेतस्थळाच्या माध्यमातून ग्राहकांची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी साई पॅलेस हॉटेलचे महाव्यवस्थापक गणेश भंडारी (६४) यांच्या तक्रारीवरून एमआयडीसी पोलिसांनी फसवणूक, तोतयागिरी करणे, बनावट लोगो तयार केल्याप्रकरणी अंधेरी येथील एमआयडीसी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून फसवणूक झालेल्या ग्राहकाच्या बँक व्यवहारांच्या माहितीच्या आधारे पोलीस पुढील तपास करीत आहेत.

### १२ वर्षाच्या मुलास कबुतराची विष्टा खाऊ घातली

✔ **पुणे :** ढाबळीतील कबुतर घेतल्याच्या वादातून सराईत गुन्हेगाराने साथीदारांच्या मदतीने एका १२ वर्षाच्या मुलाचे अपहरण करुन त्याला कबुतराची विष्टा खायला लावल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याबाबत कात्रजमधील संतोषनगर येथील एका अल्पवयीन मुलाच्या वडिलांनी भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी सराईत गुन्हेगार अमोल आडम याच्यासह चौघांवर गुन्हा दाखल केला आहे. त्यातील दोघा अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले आहे.

### 'लिव्ह इन' मधील जोडीदाराला पेटवले

✔ **पुणे :** मुलीच्या शाळेतील प्रवेशावरून वाद झाल्यानंतर महिलेने एका आपल्या मित्राच्या साथीने 'लिव्ह इन' मधील जोडीदाराला रॉकेल टाकून पेटवून दिल्याची धक्कादायक घटना समोर आली. येरवडा शास्त्रीनगर येथील महाराष्ट्र हौसिंग बोर्डजवळील सैनिक बँकसमोर मंगळवारी सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. मुकेश सुरेश राजपूत (वय ४२, रा. शास्त्रीनगर, येरवडा) असे पेटवून दिलेल्या व्यक्तीचे नाव आहे. याप्रकरणी, येरवडा पोलिसांनी उज्ज्वला दत्तात्रय कांबळे (वय ४४), राजेश जगताप (वय ५५, रा. गणपती मंदिराजवळ, शास्त्रीनगर येरवडा) या दोघांना अटक केली आहे.

### ठाण्यात उड्डाणपुलाखाली बनले धबधबे

✔ **पुणे :** येथील कापुरबावडी ते माजिवाडा परिसरात असलेल्या उड्डाण पुलावरील पावसाच्या पाण्याचा निचरा करण्यासाठी वाहिन्या टाकण्यात आल्या आहेत. परंतु या वाहिन्या अनेक ठिकाणी तुटलेल्या असून त्यातून पावसाचे पाणी धबधब्याप्रमाणे थेट रस्त्यावर पडत आहे. यामुळे वाहनांचे अपघात होण्याची भीती व्यक्त होत आहे. उड्डाण पुलावरील पावसाच्या पाण्याचा निचरा करण्यासाठी पुलाच्या खालील बाजूस वाहिन्या टाकण्यात आलेल्या आहेत. परंतु या वाहिन्या जागोजागी फुटलेल्या आहेत. त्यामुळे पुलावरील पावसाच्या पाणी वाहिन्यांमधून वाहून जाण्याऐवजी ते थेट रस्त्यावर पडत आहे.

### बंधाऱ्यातील पाण्याचा बुडून तरुणाचा मृत्यू

✔ **ठाणे :** घोडबंदर येथील ओवळे गाव भागात बंधाऱ्याचा पाण्यात गेलेला १९ वर्षीय मुलगा बुडाला. चिराग जोशी असे त्याचे नाव असून त्याचा मृतदेह सापडला आहे. कळवा येथील पारसिक नगर भागात चिराग राहतो. बुधवारी सायंकाळी तो ओवळे येथील पानखंडा परिसरातील बंधाऱ्याच्या पाण्यात बुडाला. घटनेची माहिती अग्निशमन दलाला मिळाल्यानंतर पथक त्याचा शोध घेत होते. परंतु त्याचा शोध लागू शकला नाही. त्यानंतर आजही त्याचा शोध घेतला जात होता. अखेर त्याचा मृतदेह सापडला.

### पोलिसांचा मोक्का पॅटर्न, २०९ जण गजाआड

✔ **पिंपरी :** शहरातील संघटित गुन्हेगारी मोडीत काढण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलिसांनी 'मोक्का पॅटर्न' राबविला आहे. मागील सात महिन्यांत २१ संघटित टोळ्यांमधील २०९ गुन्हेगारांवर 'मोक्का'ची कारवाई करण्यात आली. पिंपरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ३८ गुन्हे केलेल्या चौहान टोळीवरही महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मोक्का) कारवाई केली आहे.पिंपरीतील टोळी प्रमुख अमर उर्फ रिंकू कुलवंतसिंग चौहान (वय २६, रा. नेहरुनगर, पिंपरी), साहिल सुधीर धनवे (वय २०), रोहित प्रविण धवणे (वय २०, दोघे रा. महेशनगर, पिंपरी), अक्षय अण्णा रणदिवे (वय २९, रा. एमआयडीसी, भोसरी) यांना अटक करत मोक्काची कारवाई केली. तर, सोन्या रणदिवे (रा. नेहरुनगर, पिंपरी) याच्यावर गुन्हा दाखल आहे.

### विजेच्या धक्क्याने दोन तरुणांचा मृत्यू

✔ **नाशिक :** जिल्ह्यात वेगवेगळ्या घटनांमध्ये दोन जणांचा विजेच्या धक्क्याने मृत्यू झाला. त्र्यंबकेश्वर तालुक्यातील देवराम वाघ (५२) हे कळमुस्ते शिवारातील सरकारी दवाखान्यामागे असलेल्या जंगलात औषधी वनस्पती शोधण्यासाठी गेले होते. विजेच्या खांबाजवळून जात असतांना त्यांचा खांबाला स्पर्श झाला. विजेच्या धक्क्याने त्यांचा मृत्यू झाला. दुसरी घटना नांदगाव तालुक्यात घडली. गंगाधरी येथे घराचे काम सुरु आहे. अजय शिंदे (१८) या ठिकाणी काम करीत असताना विजेचा धक्का लागला. त्याला तातडीने नांदगाव येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु उपचार सुरू होण्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाला.

### टवाळखोरांविरुध्द पोलीस रस्त्यावर...

✔ **नाशिक :** नाशिकरोड परिसरात दत्त मंदिर रस्त्यावर वाहनांची तोडफोड करणाऱ्या टोळीवर मोक्कांतर्गत कठोर कारवाईची तयारी पोलिसांनी सुरू केली आहे. यातील फरार तिघांना घोटी आणि मालेगाव येथून पकडण्यात आले. या प्रकरणात आतापर्यंत अटक झालेल्या सात संशयितांना न्यायालयाने शुक्रवारपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. टवाळखोरांकडून कायदा व सुव्यवस्थेला आव्हान दिले जात आहे. या पार्श्वभूमीवर, शहर पोलिसांनी आता रस्त्यावर उतरून कारवाईचा बडगा उगारण्याची तयारी केली आहे.

### संभाजी भिडेंचे पुन्हा वादग्रस्त वक्तव्य

✔ **नागपूर :** हिंदू धर्मात स्वार्थापोटी सख्ख्या भावालाही दगा देण्याची वृत्ती आहे, असं वक्तव्य श्रीशिवप्रतिष्ठान हिंदुस्थान संस्थेचे संस्थापक मनोहर भिडे ऊर्फ संभाजी भिडे यांनी नागपूरमध्ये केलं आहे. हिंदुस्थानावर शेकडो आक्रमणं झाली कारण हिंदूंचा स्वभावगुण त्यासाठी कारण आहे असंही संभाजी भिडेंनी म्हटलं आहे. हिंदू समाज आत्मविश्वास शून्य आहे हे सांगायलाही भिडे गुरुजी विसरले नाहीत. श्रीशिवप्रतिष्ठान हिंदुस्थान संस्थेच्या नागपूर विभागाने सुभाष रोड, गीता मंदिर याठिकाणी मार्गदर्शक बैठक आयोजित केली होती. त्या बैठकीत बोलत असताना त्यांनी हे वक्तव्य केलं आहे.

### ईडीचे संचालक मिश्रा यांना पुन्हा मुदतवाढ

✔ **नवी दिल्ली :** केंद्र सरकारने मागणी केल्याप्रमाणे आता ईडीचे संचालक संजय कुमार मिश्रा यांना अखेर मुदतवाढ देण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने घेतला आहे. संजय मिश्रा यांना ईडीचे संचालक म्हणून १५ सप्टेंबरपर्यंत मुदतावाढ देण्यात आली आहे. मिश्रा हे फायनान्शिअल ॲक्शन टास्क फोर्सच्या पुनर्रचनेच्या प्रकियेत सहभागी असल्याने राष्ट्रीय हितासाठी त्यांना १५ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी केंद्र सरकारने न्यायालयाकडे केली होती. एस. के. मिश्रा यांचा ईडी संचालक म्हणून कार्यकाळ ३१ जुलै रोजी संपणार आहे.

# इसिसमध्ये रिक्रुटमेंट करणाऱ्या डॉक्टरला पुण्यात अटक

✔ सुराज्य/पुणे

**कोयता गँगची दादागिरी, सार्वजनिक ठिकाणी गुंडांची गुंडागर्दी आणि तरूणी तसेच महिलांवरील अत्याचार यामुळे सांस्कृतिक शहर म्हणून ओळख असलेल्या पुणे शहराची पुरती बदनामी होत चालली आहे. अशातच या शहरात दहशतवाद्यांचे अड्डेही आहेत की, अशी चिंता करायला लावणाऱ्या घटना उघडकीस येतायेत. कोथरूड पोलिसांनी अटक केलेल्या दोन दहशतवाद्यांची कसून चौकशी सुरू असतानाच राष्ट्रीय तपास संस्था अर्थात 'एनआयए' या तपास यंत्रणेकडून आयएसआयएस या खतरनाक दहशतवादी संघटनेत भरती करण्याची जबाबदारी असलेल्या एका डॉक्टरला पुण्यातच कोंढवा परिसरातून अटक करण्यात आल्याने पोलीस दलात खळबळ उडाली आहे. पुण्याला इंडियन मुजाहिद्दीन या दहशतवादी संघटनेचा विळखा पडत चालल्याचा संशय आहे.**

एनआयएने पुण्यात मोठी कारवाई केली. इसिसच्या रिक्रुटमेंटची जबाबदारी असलेल्या डॉक्टरला एनआयएच्या अधिकाऱ्यांनी अटक केली. राष्ट्रीय तपास संस्थेने महाराष्ट्र मॉड्यूल प्रकरणात ही कारवाई केली. या प्रकरणातील ही पाचवी अटक आहे. झडतीदरम्यान त्या डॉक्टरकडे इलेक्ट्रॉनिक गॅझेट्स आणि आयएसआयएसशी संबंधित अनेक दस्तऐवज यासारख्या अनेक दोषी साहित्य जप्त करण्यात आल्याचे एनआयएने म्हटले आहे. कोंढवा परिसरात छापा टाकून डॉ. अदनानली सरकार (४३) याला अटक करण्यात आली. हा डॉक्टर पुण्यातील तरुणांना प्रेरित करून आणि संघटनेमध्ये भरती करत असल्याची माहिती तपासात उघड झाली आहे.

एनआयएच्या तपासानुसार, 'सरकार देशाची शांतता बिघडवण्याचा प्रयत्न करत होता. पुण्यात एका इंजिनियरला अटक केल्यानंतर त्यांच्याकडे कसून चौकशी केली होती. त्यानंतर ही पाचवी अटक करण्यात आली आहे. मुंबई, ठाणे आणि पुणे येथे मोठ्या प्रमाणावर शोध घेतल्यानंतर ३ जुलै २०२३ रोजी एनआयएने इतर चार जणांना मुंबईत अटक केली होती. मुंबईतील तबिश नासेर सिद्दीकी, पुण्यातील जुबेर नूर मोहम्मद शेख, अबू नुसैबा आणि ठाण्यातील शरजील शेख आणि झुल्फिकार अली बडोदावाला अशी त्यांची नावे आहेत.



**'इंडियन मुजाहिद्दीन'चा पुन्हा धोका**

कोथरूड येथे पकडलेले दोन दहशतवादी 'अल सुफा' या दहशतवादी संघटनेशी जोडले असल्याची माहिती समोर आल्यानंतर 'अल सुफा' म्हणजे 'बंदी घातलेली इंडियन मुजाहिद्दीन' संघटना असल्याची माहिती तपास यंत्रणांना मिळाली आहे. राजस्थानची राजधानी जयपूर येथे दाखल गुन्ह्यांत दोघांवरील आरोपपत्रात याचा उल्लेखही करण्यात आला आहे. महंमद युनूस महंमद याकू साकि (वय २४) आणि महंमद इम्रान महंमद युसूफ खान (वय २३, दोघे रा. चेतना गार्डन, मीठानगर, कोंढवा) अशी त्यांची नावे आहेत. त्यांचा म्होरक्या महंमद शहनवाज आलम (वय-३१) फरारी आहे. साकि आणि खान यांना राज्य दहशतवाद विरोधी पथकाच्या (एटीएस) ताब्यात देण्यात आले आहे. या दहशतवाद्यांनी पुणे, सातारा, कोल्हापूरच्या जंगलात बॉम्बस्फोटाची चाचणी केल्याची माहिती 'एटीएस'ने न्यायालयात सादर केली. याअनुषंगाने पोलीस महासंचालक आणि राज्य दहशतवाद विरोधी पथक अर्थात एटीएसचे प्रमुख सदानंद दाते यांनी पुण्यात बुधवारी आढावा बैठक घेतली. दहशतवाद्यांना कोथरूड पोलिसांनी पकडल्याने तसेच दहशतवाद्यांचे वास्तव्य कोंढवा येथे असल्याचे सिद्ध झाल्याने या पोलीस ठाण्यांच्या प्रमुखांसह स्थानिक पोलिसांसोबत या प्रकरणाचा आढावा घेण्यात आला. या प्रकरणाच्या तपासात स्थानिक पोलिसांनी 'एटीएस'ला सहकार्य करावे, अशी सूचना दाते यांनी केल्याचे सांगण्यात येते.

**लवकरच धागेदोरे सापडतील**

दोन दहशतवादी प्रशिक्षित असून, त्यांना हल्ल्यांसाठी प्रशिक्षण देण्यात आले होते. खान आणि साकि पुण्यात कोणत्या चार जणांना भेटले होते; तसेच त्यांना कोणी मदत केली, या दृष्टीने 'एटीएस'कडून तपास करण्यात येत आहे. जयपूर येथील संभाव्य घातपाताच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनआयए) या दोघांचा शोध घेत होती. पुण्यात पूर्वी झालेल्या जर्मन बेकरी, फरासखाना आणि जंगली महाराज रस्ता बॉम्बस्फोटात इंडियन मुजाहिद्दीनचा सहभाग होता. ही दहशतवादी संघटना पुन्हा दुसऱ्या नावाने सक्रिय झाल्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. कोथरूड परिसरात अटक केलेले दहशतवादी प्रशिक्षित असून, या प्रकरणाचा तपास प्रगतिपथावर आहे. या दोघांना हाताळणाऱ्या सूत्रधारांबाबत महत्त्वपूर्ण माहिती तपासात मिळाली आहे. साक्षीदारांचे जबाब नोंदवण्याचे काम सुरू आहे. येत्या दोन दिवसांत महत्त्वाचे धागेदोरे मिळतील, असे दाते सांगतात.

## राज्यपाल नियुक्त
# १२ आमदारांचा फॉर्म्युला अखेर ठरला

✔ सुराज्य/मुंबई



विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनानंतर राज्यपाल नियुक्त आमदारांची नियुक्ती होण्याची शक्यता आहे. भाजपच्या वाट्याला ६, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला ३ आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला ३ जागा असा फॉर्म्युला ठरल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. अधिवेशनानंतर तिन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाल्यानंतर राज्यपालांना यादी पाठवली जाणार आहे, असंही सूत्रांनी सांगितलं आहे.

राज्यात ठाकरे सरकार असताना राज्यपाल नियुक्त १२ आमदारांचा मुद्दा चांगलाच गाजला होता. महाविकास आघाडी सरकारच्या कार्यकाळात शेवटपर्यंत माजी राज्यपाल भगत सिंह कोशारी यांनी ठाकरे सरकारने दिलेली नावे मंजूर केली नव्हती. यावरुन राजकारणही रंगले होते. उद्धव ठाकरेच नाहीत तर खुद्द शरद पवार यांनी देखील भगत सिंह कोशयारी यांच्यावर जोरदार टीका केली होती. याच दरम्यान राज्यपाल नियुक्त १२ आमदारांच्या नियुक्तीसंदर्भातली याचिका सर्वोच्च न्यायालयात गेली. मात्र आता नियुक्तीची स्थगिती सुप्रीम कोर्टाने उठवल्याने आता राज्यपाल नियुक्त आमदार होण्याचे अनेकांचे स्वप्न पूर्ण होणार आहे.

२०१९ च्या निवडणुकीत विधानसभा निवडणुकीत पराभव झालेल्या तसंच शिंदे आणि फडणवीस यांच्यावर विश्वास ठेवत पक्षात आलेल्या लोकांना जास्त संधी मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसंच विधानपरिषदेची टर्म संपलेलेही अनेक जण लॉबिंग करत आहेत.

# पंचाहत्तरीनंतरही पंतप्रधानपदी राहण्याचे मोदींचे सूतोवाच?

✔ सुराज्य/नवी दिल्ली

२०१९च्या निवडणुकांआधी भाजपाचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी व मुरली मनोहर जोशी यांना तिकिट न दिलं जाण्यावरून राजकीय चर्चेला उधाण आलं होतं. यासंदर्भात भाजपावर व विशेषत: पंतप्रधान नरेंद्र मोदींवर ज्येष्ठांना डावलल्याची टीका करण्यात आली होती. मात्र, हा पक्षाचा निर्णय असल्याचं भाजपाकडून तेव्हा सांगण्यात आलं होतं. त्यामुळे भाजपामध्ये ७५ वर्षांनंतर राजकीय निवृत्तीचा पक्षसंकेत रूढ झाल्याचं दिसून आलं.



एकीकडे भाजपाच्या 'पंचाहत्तरीनंतर तिकीट नाही' या पक्षसंकेताची चर्चा असताना दुसरीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी मात्र वेगळे सूतोवाच केले आहेत. बुधवारी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते दिल्लीच्या प्रगती मैदानावरील कन्व्हेन्शन सेंटरचं उद्घाटन करण्यात आलं. त्यावेळी मोदींनी बोलताना आपल्या पंतप्रधान म्हणून तिसऱ्या टर्मचा उल्लेख केला. 'माझ्या तिसऱ्या कार्यकाळात भारत जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था होईल, असं मोदींनी स्पष्ट केलयं.'

२०१४ व २०१९ असे दोन वेळा सलग पंतप्रधान नरेंद्र मोदीच भाजपाचे पंतप्रधानपदाचे उमेदवार होते. पुढील वर्षी होणाऱ्या लोकसभा निवडणुकांमध्येही नरेंद्र मोदीच भाजपाचे पंतप्रधानपदाचे उमेदवार असणार हे आता जवळपास निश्चित मानलं जात आहे. या पार्श्वभूमीवर खुद्द मोदींनीही दिल्लीत बुधवारी तसेच सूतोवाच केल्यानंतर भाजपाच्या ७५ वर्षांच्या नियमाचं काय होणार? अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

## संघ करणार नवे बदल
# दंडुक्याऐवजी आता निवडणार 'यष्टी'

✔ सुराज्य/उटी

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ विजयादशमीपासून सुरु होणाऱ्या शतक महोत्सवी वर्षाच्या तयारीला लागला आहे. अशात काळाबरोबर जात असताना संघाने आपल्या प्रशिक्षण पद्धतीत सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. संघ शिक्षा वर्गाची वेळ कमी करणे. दंडुका म्हणजेच संघ स्वयंसेवकाच्या हाती असलेली बांबूच्या काठीचं स्वरुप बदलणं या सगळ्यावर चर्चा सुरु आहे. बांबूची काठी किंवा दंडुका हा संघ गणवेशाचा भाग नाही तरीही दंड ही संघाची ओळख बनला आहे. उटी या ठिकाणी झालेल्या बैठकीत या सगळ्या नव्या सुधारणांवर चर्चा झाली आहे असंही समजतं आहे.

पहिल्या वर्षीच्या होणाऱ्या प्रशिक्षणाला संघ शिक्षा वर्ग असं म्हटलं जाईल. तर इतर दोन वर्षांच्या प्रशिक्षणाला कार्यकर्ता विकास शिबीर असं म्हटलं जाईल असंही सूत्रांनी दिलं जाईल.

उटीमध्ये झालेल्या बैठकीत दंडुका म्हणजेच स्वयंसेवकांच्या हाती असलेल्या काठीची उंची कमी करण्यावर बरीच चर्चा झाली असंही कळतं आहे. दंडुका हा गणवेशाचा भाग नाही. मात्र, दंडुका घेऊन गणवेशातच यायचं आहे असं सांगण्यात येतं. त्यामुळे दंड हा स्वयंसेवकांबरोबर दिसणारा अविभाज्य घटक झाला आहे. या बैठकीत तीन फुट उंचीची यष्टी दाखवण्यात आली. आता कदाचित संघ स्वयंसेवकांच्या हाती ही यष्टी दिसू शकते. मात्र त्यावर अद्याप कुठलाही निर्णय झालेला नाही.

चर्चा अशीही आहे की, दंडुका म्हणजे संघ स्वयंसेवकांच्या हाती असणारी काठी याचं स्वरुपही बदललं जाईल. सध्याच्या घडीला या काठीची उंची ५.३ फूट अशी आहे. ती बदलून तीन फूट केली जाणार आहे आणि त्याला आता यष्टी असं म्हटलं जाईल याबाबत चर्चा झाल्याचंही समजतं आहे.

# सोलापूरसह १३०९ रेल्वे स्थानकाचे रुप पालटणार

✔ सुराज्य/पुणे

रेल्वे मंत्रालयाने रेल्वे स्थानकांचा विकास करण्यासाठी अमृत भारत स्थानक योजना राबवण्यास सुरुवात केली आहे. या अंतर्गत देशभरातील १३०९ स्थानकांचा कायापालट केला जाणार आहे. यात सोलापूरसह पुणे, लोणावळा, दौंड, कोल्हापूर, सातारा, सांगली आणि इतर स्थानकांचा यामध्ये समावेश आहे.केंद्र सरकारने अमृत भारत स्थानक योजना राबवण्यास सुरुवात केली आहे. या योजनेंतर्गत देशभरात एक हजार ३०९ स्थानकांचा विकास केला जाणार आहे. यात सोलापूरसह पुणे, अकोला, भुसावळ, चंद्रपूर, कोल्हापूर, दादर, गुलबर्गा, जळगाव, कल्याण,




कुर्ला, मलकापूर, मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, नागपूर, नाशिक रोड, ठाणे, वर्धा, लोणावळा, मनमाड, अमरावती, मिरज, अहमदनगर, माथेरान, चाळीसगाव, देवळाली, शेगाव, कराड, सांगली, दादर, वांद्रे टर्मिनस, मुंबई सेंट्रल, धरणगाव या स्थानकांचा समावेश आहे.

या योजनेत स्थानकांचा कायापालट केला जाणार आहे. यामुळे या स्थानकांचा चेहरामोहरा बदलणार आहे. दीर्घकालीन दृष्टिकोनातून स्थानकांचा विकास करण्यावर यात भर दिला जाणार आहे. स्थानकांचा दीर्घकालीन विकास आराखडा तयार करून सुविधांचे नियोजन केले जाणार आहे. प्रत्येक स्थानकाचा विकास करताना तेथील रोजची सरासरी प्रवासी संख्या लक्षात घेऊन नियोजन करण्यात येणार आहे. याचबरोबर स्थानकाची सध्याची रचनाही विचारात घेतली जाणार आहे. प्रामुख्याने प्रवासीकेंद्रित सुविधा स्थानकांवर विकसित केल्या जातील. स्थानकाच्या बाह्य रुपासोबत अंतर्गत भागातही सुधारणा केल्या जाणार आहेत.

**कशा पद्धतीने होणार विकास?**

▶ परिसरातील वाहतूक सुधारणा ▶ परिसराचे सुशोभीकरण ▶ प्रवेशद्वारांचा विकास ▶ प्रतीक्षागृहांची उभारणी ▶ स्वयंचलित जिन्यांची उभारणी ▶ अंतर्गत रचनेत सुधारणा ▶ स्वच्छतागृहांमध्ये सुधारणा ▶ सुसज्ज व स्वच्छ विक्री केंद्र ▶ मोफत वाय-फाय किऑस्क.

# केवळ एक रुपयात पीक विमा पण...

▶ **वेबसाईट वारंवार हँग;**
▶ **विमा भरावा तरी कसा?**
▶ **राज्यातील लाखो शेतकरी संभ्रमित**

✔ सुराज्य/मुंबई

राज्यातील शेतकऱ्यांना पीक विमा भरण्यासाठी पहिल्यांदाच राज्य सरकारने जबाबदारी घेतली. सरकारच्या या योजनेतून एक रुपयांमध्ये शेतकऱ्यांना आपल्या शेतातील उभ्या पिकाचा विमा उतरवता येणार आहे.

मात्र, गेल्या चार दिवसापासून पीक विमा भरण्यासाठी सरकारची वेबसाईट योग्यप्रकारे चालत नसल्याने शेतकऱ्यांना पीक विमा भरण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागत आहे. वेबसाईडट वारंवार हँग होत असल्याने पीक विमा भरावा तरी कसा?, असा प्रश्न राज्यातील लाखो शेतकऱ्यांसमोर पडला आहे?

यावर्षी पहिल्यांदाच एक रुपयात पीक विमा भरून घेत जात असल्याने सर्वच शेतकरी पीक विमा भरण्यासाठी पुढाकार घेत आहेत. त्यामुळे, सर्वच सीएससी सेंटरवर शेतकरी पीक विमा भरण्यासाठी गर्दी करत असले तरी, दुसरीकडे मात्र पीक विमा भरण्यासाठीची वेबसाईट सतत हँग होत असल्याने शेतकऱ्यांना दिवस-दिवस सीएससी सेंटरवर बसून राहावं लागत आहे. पिक विमा भरण्यासाठी ३१ जुलै ही शेवटची तारीख असून या तारखेच्या आत शेतकऱ्यांना पीक विमा भरावा लागणार आहे.

राज्यात काही ठिकाणी शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागली आहे. त्यामुळे नुकसान झाल्यानंतर मदत मिळावी म्हणून मोठ्या प्रमाणात शेतकरी एक रुपयांमध्ये पीक विमा भरत आहेत. मात्र पीक विमा भरण्यासाठीची वेबसाईट चालत नसल्याने पिकाचं नुकसान झाल्यानंतर मदत कशी मिळणार असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे. राज्यामध्ये एकूण एक कोटी ४७ लाख शेतकरी आहेत. यापैकी एक कोटी १७ लाख शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील



उभे पिकाचा विमा उतरवला आहे. आणखी शेतकरी पीक विमा भरण्यासाठी रोज सीएससी सेंटरच्या चकरा मारत आहेत. राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी मात्र शेतकरी पिक विमा भरण्याविना राहणार नाही, असे आश्वासन दिलं आहे.

जून महिन्यात हुलकावणी देणाऱ्या पावसाने अखेर जुलै महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात सर्व दूर दमदार हजेरी लावली खरी मात्र, अद्याप राज्यातील बहुतांश भागातील पाण्याचा साठा वाढलेला नाही. अशा परिस्थितीत हवामानाचा फटका शेतीला बसलाच तर, पिक विमा एकमेव आधार शेतकऱ्यांना असतो आणि त्यामुळेच विना अडथळा तो पिक विमा शेतकऱ्यांना मिळावा, हीच अपेक्षा.

**मुदतवाढीची मागणी**

बीड जिल्ह्यामध्ये आतापर्यंत १७ लाख ९ हजार शेतकऱ्यांनी पीक विमा भरण्यासाठी नोंदणी केली आहे. तर, अद्यापही जिल्ह्यातील ४० टक्के शेतकऱ्यांचा पिक विमा भरणे बाकी आहे, त्यामुळे बीड जिल्ह्यातीचच कृषिमंत्री असलेल्या धनंजय मुंडे यांनी तात्काळ या प्रकरणात विशेष लक्ष देऊन पीक विमा भरण्यासाठी वेबसाईट सुरळीत करून पीक विमा भरण्यासाठी मुदत वाढ देण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

# जिल्हा प्रशासन महसूल सप्ताह साजरा करणार

## १ ते ७ ऑगस्ट दरम्यान विविध कार्यक्रमांचे आयोजन

सुराज्य/सोलापूर

**महसूल विभागाकडून देण्यात येणाऱ्या सेवा तसेच राबविण्यात येणाऱ्या विविध योजना याबाबत नागरिकांना अधिकाधिक माहिती प्राप्त होऊन त्यांना योग्य लाभ घेता यावा. तसेच त्याबाबत नागरिकांमध्ये जागरुकता वाढावी, शासनाबद्दल आणि शासनाच्या कामकाजाबद्दल नागरिकांचा विश्वास वृद्धींगत होण्यासाठी १ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट या कालावधित ऑगष्ट या कालावधीत महसूल सप्ताह साजरा करण्यात येणार आहे.**

महसूल सप्ताह निमित्त १ ऑगस्ट रोजी महसूल दिन साजरा करण्यात येणार आहे. महाराजस्व अभियानांतर्गत केलेल्या कामाची दखल घेऊन महसूल विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचा गौरव सन्मान करण्यात येणार आहे. जमीन महसूल अधिनियम कलम १५५ खालील ई-हक्क पोर्टलवरील प्रलंबित प्रकरणे तलाठ्यामार्फत निकाली काढणेची कार्यवाही करण्यात येणार आहे. महाराजस्व अभियानातील गाव तिथे स्मशानभूमी, दफनभूमी सुविधा उपलब्ध करण्याबाबत विशेष मोहिम राबविण्यात येणार आहे

२ ऑगस्ट २०२३ रोजी दाखले व प्रमाणपत्रांचे तत्काळ वितरण महाविद्यालय स्तरावर केले जाणार आहेत. विविध घटकांतील लाभार्थी विद्यार्थ्यांना केंद्र व राज्य शासनाद्वारे देण्यात येणाऱ्या विविध शिष्यवृत्ती व कार्यक्रमाबाबत माहितीपत्रके शाळा, महाविद्यालयांमध्ये वितरीत करुन अंमलबजावणी करण्यात येणार आहे.शालेय विद्यार्थ्यांचे आधारकार्ड काढणे अद्ययावत करणे यासाठी विशेष मोहिमेर्तंगत शाळेच्या ठिकाणी, स्वस्त धान्य दुकान, बँक, पोष्ट कार्यालय येथे आधार मशीन्स उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. ३ रोजी एक हात मदतीचा या अतर्गत मान्सुन पुर्व




व मान्सुन कालावधीत अवकाळी पाऊस,अतिवृष्टी, पूर यामुळे बाधित झालेल्या नागरिकांना देय असलेल्या सोई सुविधा, नुकसान भरपाई देण्याबाबत कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेच पिक विम्यासाठी विविध दाखले तत्काळ तलाठीस्तरावर प्रदान करण्यात येणार आहेत. ४ ऑगस्ट रोजी जनसंवाद कार्यक्रमार्तंगत महसूल अदालतींचे आयोजन करुन सर्व स्तरावरील अपिले निकाली काढण्यात येणार आहेत. सलोखा योजनेंतर्गत गावा-गावांतील व शेतातील रस्त्यांबाबत प्रलंबित अर्ज निकाली काढण्यासाठी शिबिरे आयोजन करण्यात येणार आहेत. ५ ऑगस्ट रोजी सैनिक हो तुमच्यासाठी या कार्यक्रमार्तंगत सैनिकांच्या विविध अडीअडचणींबाबत आढावा घेऊन तातडीने निराकरण येईल तसेच जमिनीचे तंटे, प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात येतील. ६ ऑगस्ट रोजी जिल्ह्यातील महसूल संवर्गातील अधिकारी, कर्मचारी यांची प्रलंबित सेवाविषयक बाबी निकाली काढणेत येतील. ७ ऑगस्ट रोजी महसूल विभागामार्फत महसूल सप्ताह निमित्त घेतलेल्या विविध उपक्रमांबाबतची फलनिष्पत्ती व विशेष उल्लेखनीय कामकाजाची दखल घेण्यासाठी महसूल सप्ताहाचा सांगता समारंभ आयोजित करण्यात येणार

## अक्कलकोटमध्ये दोन म्हशींचा मृत्यू

अक्कलकोट : तालुक्यातील कुरनूर येथे सर्पदंशाने एक म्हैस तर अक्कलकोट शहारातील जुन्या किणीरोडवर एक म्हैस विजेचा धक्का लागुन मयत झाल्याची घटना घडली. कुरनुर व अक्कलकोट येथील दोन म्हशी मृत्युमुखी पडल्या.



अक्कलकोट येथील शेतकरी महादेव लिंबाजी मोरे (वय ४० वर्षे) यांच्याकडे ६ म्हैशी असून मागील दोन तीन दिवसापासून अक्कलकोट शिवारात पाऊस झाल्याने बारीक बारीक हिरवे गवत उगवले आहे. २७ जुलै रोजी दुपारी भालके यांच्या शेताजवळ म्हशीचा विजेच्या धक्क्याने मृत्यू झाला. याबाबत उत्तर पोलीस स्टेशनयेथे मयत नोंद झाली आहे.

दुसऱ्या घटनेत कुरनूर येथील शेतकरी भीम राम मोरे उर्फ पिंटू मोरे यांच्या शेतामध्ये चाऱ्यासाठी म्हणून म्हैस बांधण्यात आलेली होती. या म्हशीला सर्पदंश झाल्याने मृत्यूमुखी पडली.

पंढरपुरी गवळार म्हैस असून तिची किंमत साधारण ८५ हजाराच्या आसपास होती. परंतु दुपारच्या सुमारास सर्पदंशने मरण पावली. घटनेची माहिती मिळताच पशुवैद्यकीय अधिकारी एस.एस कराळे, वैद्यकिय सहाय्यक मनोज वडगावे, लहू चव्हाण प्रसाद मोरे, रफिक तांबोळी, भीमाशंकर कलकुटगे यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. तहसिलदार बाळासाहेब सिरसट यांनी तलाठी यांना पंचनामा करण्यास सांगितले असल्याची माहिती दिली.




## कॉ.नारयणराव आडम यांच्या स्मृतिदिनी ५१८ जणंचे रक्तदान

**सोलापूर** : सोलापूरातील मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे संस्थापकीय सदस्य, स्वातंत्र्यसैनिक कॉ.नारायणराव आडम यांच्या स्मृतिदिनीचे औचित्यसाधून दरवर्षी प्रमाणे यंदाही २६ जुलै दत्त नगर येथे रक्तदान शिबिर घेण्यात आले. यात ५१८ जणांनी सहभाग नोंदवला. प्रारंभी माकप चे जिल्हा सचिव अॅड.एम.एच.शेख व अशोक इंदापुरे यांच्या हस्ते तर कॉ.गोदूताई परुळेकर नगर कुंभारी येथे ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार कॉ.नरसय्या आडम मास्तर व माजी नगरसेविका कॉ कामिनीताई आडम यांच्या हस्ते करण्यात आले. रक्तदान शिबिरासाठी नलिनीताई कलबुर्गी, नसीमा शेख, व्यकंटेश कोंगारी, सिद्धप्पा कलशेट्टी, युसूफ शेख मेजर, शेवंता देशमुख, सुनंदा बल्ला, कुरमय्या म्हेत्रे, मुरलीधर सुंचू,विल्यम ससाणे विक्रम कलबुर्गी,अॅड.अनिल वासम, हसन शेख, दाऊद शेख, नरेश दुगाणे यांच्यासह कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन अँड.अनिल वासम यांनी केले.

## केळी विक्रेत्यावर कुऱ्हाडीने वार; दोघांवर गुन्हा दाखल

**सोलापूर** : पैशाची मागणी करत केळी विक्रेत्यावर कुऱ्हाडीने वार करत बोट तोडल्या प्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल झाला आहे.राम चव्हाण,रोहित चव्हाण (रा.कल्याण नगर रेल्वे पटरी जवळ,जुळे सोलापूर) असे गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.त्यांना विजापूर नाका पोलिसांनी अटक केली आहे.याबाबत नुरद्दिन वजीर बागवान (वय-२१, होटगी रोड) यांनी विजापूर नाका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. २६ जुलै रोजी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास बागवान यांना शेजारील महिलेने फोन करून त्यांच्या भाच्याला कुऱ्हाडीचा धाक दाखवत वरील संशयित आरोपी पैशासाठी दमदाटी करत असल्याचे सांगितले.यामुळे फिर्यादी हे घटनास्थळी गेल्यानंतर संशयित आरोपींनी त्यांनाही शिवीगाळ केली.शिवाय हातातील कुऱ्हाडीने हल्ला केला. यात त्यांचे बोट तुटले. आरोपींनी हातगाडीवरील गल्ल्यातील पाचशे ते सहाशे रुपये जबरदस्तीने घेऊन तेथून पळून गेले. बागवान यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे.याप्रकरणी आरोपी राम चव्हाण,रोहित चव्हाण यांच्या गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा तपास पोलिस करत आहेत.

## सिव्हिल हॉस्पिटलसमोरून दुचाकी पळवली

**सोलापूर** : सिव्हिल हॉस्पिटल समोर पार्क केलेली दुचाकी क्र.एमएच.१३.बीझेड.९७४० ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.ही घटना १७ जुलै रोजी दुपारी साडेतीन ते रात्री साडेसात वाजण्याच्या दरम्यान घडली.याप्रकरणी अनिल विश्वनाथ पंगुडवाले (वय-३४,रा.जुना विठ्ठल मंदिर) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार शेख हे करीत आहेत.

## संत रविदास मित्र समाजभूषण पुरस्काराचे जेऊरकर, धनशेट्टी, चाबुकस्वार, अँड.सदाफुले, गवळी मानकरी

### शनिवारी चर्मकार समाजाचा महामेळावा

सुराज्य/सोलापूर

राष्ट्रीय चर्मकार महासंघ सोलापूर शहर व जिल्हा शाखा यांच्यावतीने सोलापूर जिल्हयातील चर्मकार समाजबांधवांचा स्नेह मेळावा आयोजित करण्यात आल्याची माहिती प्रदेश कार्याध्यक्ष संजय शिंदे यांनी पत्रकार परिषेदेत दिली. यावेळी ाजशेखर जेऊरकर, संजय धनशेट्टी, सिध्दाराम चाबुकस्वार, अँड. संजीव सदाफुले, मधुकर गवळी व दत्ता गवळी यांना संत रविदास मित्र समाजभूषण पुरस्कार देऊन गौरव केला जाणार आहे,



शनिवारी डॉ निर्मलकुमार फडकुले सभागृहात सकाळी ११.०० मेळावा होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षास्थानी माजी समाजकल्याण मंत्री व राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष बबनराव घोलप. . तर प्रमुख पाहुणे म्हणून आ. विजयकुमार देशमुख, प्रणितीत शिंदे, राम सातपुते असणात आहेत. तसेच राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय सचिव ज्ञानेश्वर कांबळे, प्रदेशाध्यक्ष माधवराव गायकवाड उपस्थित राहणार आहेत. याच वेळीस समाजातील इयत्ता १० वी, इयत्ता १२ वी परिक्षेत विशेष गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार तसेच समाजातील विविध पदावर अधिकारी, पत्रकार, ग्रामपंचायत सदस्य, पंचायत समिती, नगरसेवक यांचाही सत्कार करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा अध्यक्ष अजय राऊत यांनी दिली.

या पत्रकार परिषेदत मुधकर यवळी, प्रशांत कांबळे, रामचंद्र कबाडे, गणेश तुपसमुद्रे, परशुराम मब्रुखाने, शावरप्पा वाघमारे, बाळासाहेब आळसंदे, सर्फराज कांबळे, शिवपुत्र वाघमारे, अशोक सुरवसे, इस्माईल हुलसुरे, राजेंद्र कांबळे, लक्ष्मण चाबुकस्वार आदीजण उपस्थितीत होते.

## राजेंद्र चौक ते हत्तरसंग कुडल मार्गावर सिटी बससेवा सुरू

सुराज्य/सोलापूर

अधिक महिना व श्रावणमास असल्याने शहर, ग्रामीण भागातील नागरिकांकरिता राजेंद्र चौक ते हत्तरसंग कुडल या मार्गावर सिटी बसची सोय करावी अशी मागणी प्रवाशांकडून होत होती. अखेर महापालिकेच्या परिवहन विभागाच्या वतीने मागणी मान्य केली असून २७ जुलैपासून राजेंद्र चौक ते हत्तरसंग कुडल या मार्गावर भक्तांकरिता सिटी बसची सोय करण्यात आली आहे.

सोलापूर महानगरपालिकेच्या आयुक्त शीतल तेली - उगले यांनी निर्णय घेऊन जुन्या बसेसच्या माध्यमातून परिवहन बस सेवा पुन्हा सुरू केली आहे. सध्या सोलापूर शहरात २५ बसेस धावत



आहेत. दरम्यान, सोलापूर शहर व ग्रामीण भागातील प्रवाशांसाठी हत्तरसंग कुडल येथील शिव मंदिर व संगमस्थान असल्याने पर्यटन स्थळे, अधिकमहिना व श्रावणमास असल्याने टाकळी, नांदणी बरोबर व हत्तरसंग कुडल येथील नागरिक व प्रवाशांची मागणी लक्षात घेऊन नागरिकांसाठी ही बस सेवा सुरू करण्यात आली आहे. २७ जुलैपासून सकाळी आठ वाजता , दुपारी पावणेचार वाजता राजेंद्र चौक इथून हत्तरसंगकुडल पर्यंत दैनंदिन बसची सोय करण्यात आलेली आहे. दरम्यान, ३१ जुलैपासून राजेंद्र चौक ते बी.बी.दारफळ ही बस देखील पूर्ववत चालू करण्यात येणार आहे. या मार्गावरील प्रवाशांनी या बस सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन परिवहन व्यवस्थापक यांच्याकडून करण्यात आले आहे.

### अश्विनी रुग्णालयाचा अभिनव उपक्रम

## नूतन न्यूरो रिहॅबिलिटेशन केंद्राचा रविवारी शुभारंभ

सुराज्य/सोलापूर

अश्विनी सहकारी रुग्णालय आणि संशोधन केंद्र या संस्थेने नवीन न्यूरो रिहॅबिलिटेशन सेंटरची उभारणी केली आहे.त्याचे उद्घाटन जागतिक किर्तीचे मेंदूरोग तज्ञ डॉ. निर्मल सूर्या (मुंबई) यांच्या हस्ते रविवार दि. ३० जुलै रोजी सकाळी १० वाजता होणार आहे. संस्थेचे चेअरमन बिपिनभाई पटेल यांनी ही गुरूवारी पत्रकार परिषदेत दिली.

डॉ. सूर्या यांना जागतिक आरोग्य संघटनेने प्रस्थापित केलेल्या वर्ल्ड Federation of Neuro Rehabilitation मध्ये भारताचे प्रतिनिधीत्व करणेसाठी नुकतेच सन्मानाने निमंत्रित केले होते. डॉ. सूर्या हे Indian Federation of Neuro Rehabilitation चे विद्यमान अध्यक्ष असून, मेंदूरोगग्रस्त रुग्णांच्या पुर्नवसन कार्यामध्ये अग्रेसर असून अशा केंद्राच्या उभारणीसाठी त्यांनी अथक परिश्रम केले



आहेत. यानिमित्त डॉ. सूर्या यांचे आगमन सोलापूरसाठी अभिमानास्पद असल्याचे त्यांनी सांगितले. माणसाला कुठल्याही घटकाला कोणत्याही विकाराने घेरले तर खूप अडचणी येतात. रोजीरोटी जाऊ शकते, माणसाने माणसाशी माणसासम वागणे बिघडते, दैनंदिन सहज पार पडणारी कर्मे अवघड होतात. हे सर्व पुन्हा सुरळीत व्हावे म्हणून जुनी नवीन औषधे, मात्रा आहेत, त्यांचा वापर आहेच - पण नर्व्हस सिस्टीम रुग्णांना १०० पैकी किमान ८० टक्के पूर्वपदावर आणण्यासाठी विशिष्ट व्यायाम, त्याकरिता कौशल्य वापरुन बनवलेली साधने, मशिनरी, समुपदेशन यांची नितांत गरज असते. हे सर्व न्यूरो रिहॅबिलिटेशन - मज्जासंस्थाविकार पुनर्वसन केंद्रात उपलब्ध केलेले असते. सोलापूर अश्विनीला येणाऱ्या स्थानिक व शे-दीडशे मैलाच्या परिसरातील रुग्णांना अशा केंद्राची गरज आहे.


यानिमित्ताने वरील रुग्णांसाठी मोफत शिबिर दि. ३० जुलै रोजी सकाळी आयोजित केले आहे. शिबिरात सहभागी रुग्णांना ५० टक्के सवलतीच्या दरात भौतिकोपचार दिले जाईल. या पत्रकार परिषदेत संचालक डॉ.विजय पाटील, अशोक लांबतूरे, वैद्यकिय अधिक्षक डॉ. राजेंद्र घुली, वैद्यकिय उपअधिक्षक डॉ.प्रशांत औरंगाबादकर, प्रशासकिय अधिकारीसचिन बिज्जरगी, मेंदूरोगतज्ञ डॉ.प्रीतेश अग्रवाल, डॉ.शंतनू गुंजोटीकर, न्यूरो फिजिओथेरपीस्ट डॉ. मनीषा तळपल्लीकर, डॉ. राधिका क्षीरसागर, डॉ. संकेत हरहरे आदी उपस्थित होते.

## आ.श्रीकांत भारतीय यांच्या निधीतून विरवडेतील बुद्ध विहारासाठी १० लाखांचा निधी

सुराज्य/विरवडे बु

भारतीय जनता पक्षाचे विधान परिषदेचे सदस्य तथा आश्वासक समिती प्रमुख श्रीकांत भारतीय यांच्या स्थानिक विकास निधीतून मोहोळ तालुक्यातील विरवडे बुद्रुक येथील दलित वस्ती सुधारणे अंतर्गत बुद्ध विहारासाठी दहा लाख रुपये निधी मंजूर केल्याची माहिती भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष अंकुश आवताडे यांनी दिली.

विरवडे बुद्रुक येथील बुद्ध विहाराचा प्रश्न गेल्या अनेक वर्षापासून अडगळीत



पडला होता. स्थानिक लोकप्रतिनिधी कडून यासाठी कसलीच सकारात्मक भूमिका दिसून येत नव्हती. त्यामुळे माजी मंत्री तथा आमदार सुभाष देशमुख, जिल्हाध्यक्ष आ.सचिन कल्याणशेट्टी, आ. समाधान आवताडे, अर्थ व बांधकाम माजी सभापती विजयराज डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रश्न घेऊन आपण विधान परिषद सदस्य श्रीकांत भारतीय यांच्याकडे गेलो असता, त्यांनी विकास निधी देण्यासंदर्भात सकारात्मकता दर्शवली. त्यानुसार २४ जुलै २०२३ रोजी आमदार श्रीकांत भारतीय यांनी जिल्हा नियोजन अधिकारी मुंबई व जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हाधिकारी सोलापूर यांना प्रशासकिय मान्यता देणे संदर्भात पत्र पाठविले असल्याचे आवताडे यांनी सांगितले.

## पोलिसांना शिवीगाळ करत केली धक्काबुक्की

**सोलापूर** : होटगी रोडवरील औद्योगिक पोलिस चौकीत येऊन जोरजोरात आरडा-ओरड करत पोलिसांना शिवीगाळ करत, त्यांना धक्काबुक्की केल्याप्रकरणी एकावर गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत कॉस्टेबल अक्षय प्रभाकर धर्माधिकारी (वय-४१,रा.स्वामी विवेकानंद नगर, हत्तुरे वस्ती) यांनी विजापूर नाका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. याप्रकरणी सिध्दप्पा सायबण्णा हिपळे (वय-४२, रा.हत्तुरे वस्ती) यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

धर्माधिकारी हे औद्योगिक पोलिस ठाण्यात कार्यरत असताना २६ जुलै रोजी सायंकाळी सध्दप्पा हिपाळे तेथे येऊन जोर जोरात आरडा ओरड करू लागला.त्यावेळी धर्माधिकारी यांनी विचाराणा केली असता त्यांना अर्वाच्च भाषेत बोलत शिवीगाळ करण्यास सुरूवात केली. त्यावेळी त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना बोलवून घेतले. त्याच वेळी हिपळे यांनी मी आर्मी मॅन आहे, तुझ्या साहेबाला,तुम्हाला सगळ्यांना रस्त्यावर उभा करतो, चौकीत बसू देणार नाही असे म्हणत धक्काबुक्की केली. दरम्यान त्यावेळी बीट मार्शल तेथे आले. त्यांनाही शिवीगाळ करत बघून घेण्याची धमकी दिली. धर्माधिकारी यांच्या फिर्यादीवरून हिपळे याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

## सुरेश पाटलांची मनधरणी करण्यात पक्षश्रेष्ठींना यश

### बावनकुळे यांच्या भेटीनंतर भाजपातच राहण्याचा घेतला निर्णय

सुराज्य/सोलापूर

पक्षांतर्गत कुरबुरी, कुरघोड्या, हेवेदावे, पक्षाच्या कार्यक्रमात सामावून न घेणे, होमटाऊनमध्ये येऊन राजकीय अतिक्रमण करणे अशा प्रकाराला कंटाळून सोलापूर महापालिकेचे माजी सभागृह नेता सुरेश पाटील यांनी भाजपच्या प्रक्षश्रेष्ठींना आपली तक्रार मांडत पक्षाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता. त्यानंतर त्यांनी पक्ष सोडण्याचेही ठरवले होते. दरम्यान प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुंबई येथे बोलावून त्यांची मनधरणी केली. यात त्यांना यश आले असून यामुळे सुरेश पाटील यांच्या बंडाच्या भूमिकेवर पडदा पडला आहे. त्यांनी भाजपातच राहण्याचा निर्णय घेतला.

आमदार विजयकुमार देशमुख यांच्या कार्यपद्धतीवर नाराज असल्याने सुरेश पाटील यांनी त्यांच्या समर्थकांसमवेत काही दिवसांपूर्वी बैठक घेऊन उघड नाराज व्यक्त केली होती व पाच नगरसेवकांनी दिलेल्या राजीनाम्यात सुरेश पाटील यांचादेखील राजीनामा असल्याने सुरेश पाटील पक्ष सोडणार अशी चर्चा जोरात सुरू होती. ते बीआरएस किंवा काँग्रेसमध्ये



### वरिष्ठांच्या हमीमुळे समाधान

माझ्यावर होत असलेला अन्याय थांबवण्याची हमी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिल्याने माझे समाधान झाले आहे. बावनकुळे हे पक्ष हिताचे धोरण चांगल्या पद्धतीने राबवत असल्याचा मला विश्वास आहे. यामुळे मी हा निर्णय घेतला आहे. भविष्यात पक्ष माझा विचार करेल ही खात्री बावनकुळे साहेबांनी दिल्याने माझ्या आशा पल्लवीत झाल्या आहेत, असे पाटील यांनी सांगितले.

जातील अशी चर्चा होती. याच दरम्यान, त्यांनी आपल्या समर्थकांची गाठीभेटी घेतल्या. त्यांनी पाटील यांना भाजपातच राहण्याचा सल्ला दिला होता. सरचिटणीस शशी थोरातसह अन्यजणांनीही पाटील यांची समजूत घालत वरिष्ठांना भेटून निर्णय घ्यावा असे सूचवले होते. याच दरम्यान प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुंबईत भेटण्यासाठी पाटील यांना वेळ दिली होती. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सुरेश पाटलांना आपल्यावर अन्याय होणार नाही,अशी ग्वाही दिल्याने त्यांनी पक्षातच राहण्याचा निर्णय घेतल्याचे पाटील यांनी सांगितले.

या बैठकीत त्यांनी आपण गेल्या ४० वर्षांपासून भारतीय जनता पार्टीत काम करत आहात, मी आपल्या पाठीशी असून,पुढील महिन्यात मी सोलापूर दौऱ्यावर येणार आहे. त्यावेळी आपल्या अडचणी आणि तक्रारीवर पुन्हा एकदा चर्चा करून तोडगा काढू अशी हमी बावनकुळे यांनी दिल्याचे पाटील यांनी सांगितले. यावेळी मुंबईत पाटील यांच्यासमवेत शशी थोरात, सुशील क्षीरसागर, हेमंत पिंगळे, अक्षय अंजिखाने यांच्यासह पाटील यांचे जवळचे सहकारी उपस्थित होते.

## रस्ते दुरूस्तीच्या कामात पालिकेची दिरंगाई

सुराज्य/सोलापूर

### रस्त्यावरील खड्डे जैसे थे; नागरिकांना होतोय त्रास

महापालिकेच्या दिरंगाईमुळे पावसाळ्यात रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. सध्या तीन दिवसांपासून शहरात पाऊस सुरू आहे. रस्त्यावरील खड्ड्यामध्ये पाणी साचले आहे. त्यामुळे वाहनधारकांचे हाल होत आहेत.महापालिकेच्या रस्ते दुरूस्तीच्या कामाचा फटका नागरिकांना बसत आहे.

महापालिकेने सोलापूर शहरातील ३४० कि.मी. रस्ते खोदाई करण्यास परवानगी दिली. मात्र, खोदकाम झाल्यानंतर रस्ते पूर्ववत करण्यासाठी एप्रिल महिन्यात दहा कोटींची निविदा काढली. पावसाळ्यापूर्वी हे काम होणे अपेक्षित होते. मात्र, जुलै या कामात दिरंगाई झाल्याने शहर आणि हद्दवाढ भागातील बहुतांश रस्त्यांवर प्रचंड खड्डे आहे तसेच आहेत. खड्ड्यात पावसाचे पाणी साचल्याने नागरिकांना त्रास प्रचंड त्रास होत आहे.

पावसाने खड्डे उखडून निघणार आणि दहा कोटी पाण्यात जाणार, अशीच परिस्थिती महापालिकेच्या खड्डे मुक्त शहर अभियानाची आहे. यातून या अभियानाची वाट लागणार आहे. शहरातील नागरिकांच्या खिशामधील तब्बल १० कोटी वायपट जाणार आहेत. गेल्या दोन वर्षांपासून शहरातील चांगले,



मातीचे, खडकाचे सर्व प्रकारचे रस्ते गॅसलाईन, रिलायन्स केबल, वोडाफोन, आयडिया आणि स्मार्ट सिटीअंतर्गत सीसीटीव्ही कॅमेरा बसविणे अशा विविध कामांसाठी रस्ते खोदाईचे काम सुरू आहे.

याबदल्यात महापालिकेने संबंधित कंपनीकडून रस्ते खोदाईचे पैसे भरून घेतले होते. मात्र, रस्ते पूर्ववत केले नाहीत. या खोदकामाप्रसंगी शहरातील अनेक ठिकाणचे ड्रेनेजलाइन फुटले, नळजोड तुटले गेले, रस्त्यावर खड्डे पडले आहेत. याच्या दुरुस्तीवरून संबंधित कंपनी व महापालिका अधिकारी यांच्यामध्ये वादाचे प्रकार सुरू आहेत.

या प्रकारात मात्र नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. ११६ कि.मी. रस्ते पूर्ववत करण्यासाठी झोननिहाय १४ ठिकाणांसाठी दहा कोटींची निविदा प्रक्रिया राबविली. एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात निविदा खुली करण्यात आली. एप्रिल अखेर शहरातील खड्डे बुजविण्याच्या कामाला सुरवात होणार होती. मात्र, कामात दिरंगाई झाल्यान या रस्त्यांची दुरुस्ती झाली नाही.